अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. १६ जुलै २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २८७ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## भारताचा वेस्ट इंडिजवर एक डाव आणि १४१ धावांनी विराट विजय

**डोमेनिका :** यशस्वी जयस्वालची पदार्पणात शतकी खेळी आणि आर. अश्विनच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर भारताने वेस्ट इंडिजचा एक डाव आणि १४१ धावांनी पराभव केला. या विजयासह भारताने मालिकेत १-० ने आघाडी घेतली आहे. अश्विनने पहिल्या कसोटी सामन्यात १२ विकेट घेतल्या. त्याने पहिल्या डावात पाच आणि दुसऱ्या डावात सात विकेट घेतल्या. वेस्ट इंडिजा पहिल्या डावात १५० आणि दुसऱ्या डावात १३० धावांत रोखले.



यशस्वी जयस्वाल याने पदार्पणात १७१ धावांची दमदार खेळी केली. रोहित शर्मानेही शतकी खेळी केली. भारताने २७१ धावांची आघाडी झाल्यानंतर डाव घोषित केला. भारताच्या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना फक्त १३० धावा करता आल्या. अश्विनने सात विकेट घेतल्या. तर जाडेजाला दोन विकेट मिळाल्या. सिराजने एक विकेट घेतली. दुसऱ्या डावात वेस्ट इंडिजच्या एकाही फलंदाजाला तीस धावसंख्या ओलांडता आली नाही. अनाथाझे याने सर्वाधिक २८ धावांची खेळी केली. वेस्ट इंडिजने १०० धावांच्या आत सात विकेट गमावल्या होत्या. वेस्ट इंडिजच्या एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. जेसन होल्डर २० धावांवर नाबाद राहिला. भारताचा कर्णधार रोहितने तिसऱ्या दिवशी ४२१ धावांवर डाव घोषित केला. वेस्ट इंडिजला १५० धावांवर रोखल्यानंतर भारताने पहिल्या डावात पाच विकेटच्या मोबदल्यात ४२१ धावा केल्या. पहिल्या डावात जयस्वाल (१७१) आणि रोहित शर्मा (१०३) यांनी शतकी खेळी केली.

# दादांना 'शनी'ची पिडा, शिंदेंना सर्वांचाच 'त्रास'

# फडणवीस यांचे स्टार मात्र एकदम 'झकास'

सुराज्य/सोलापूर

**खाते वाटपाचा तिढा सुटला. महायुती सरकारचा गाडा पळू लागला. पण या सरकारविषयी एक ना अनेक शंका-कुशंका समोर येतायेत. त्यामुळे सारा महाराष्ट्र पुन्हा संभ्रमात पडला आहे. दोन पक्षांची सत्ता नीट चालत नाही, तेव्हा तीन पक्षांचे कसे पळणार? असा प्रश्न समोर आला आहे. त्यातच या सरकारविषयीची एक भविष्यवाणी वर्तवली गेलीय. एका प्रख्यात भविष्यकाराने सरकारसह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजितदादा पवार या तीन नेत्यांविषयी भाकीत वर्तवले आहे. त्यानुसार अजितदादांना येत्या काळात शनीचा तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना राष्ट्रवादीसह स्वकीयांचा भलताच त्रास होणार आहे. फडणवीस यांचे स्टार झकास असून ते अतिमहत्त्वाच्या पदावर नियुक्त होतील, असे भाकीत वर्तवले गेले आहे.**



प्रख्यात ज्योतिषाचार्य उल्हास गुप्ते यांनी ग्रहांच्या चक्रानुसार ही भविष्यवाणी वर्तवली आहे. सध्याच्या राजकारणात आयाराम गयाराम यांचा पक्षांतर कार्यक्रम जोरात सुरू आहे. महाराष्ट्रात २०१९ पासून सुरू झालेला सत्तासंघर्ष इतका टोकाला गेला आहे की, त्यात हे राजकिय नेते स्वत:चे राजकिय आणि त्याचबरोबर कौटुंबिक नातेसंबंधही अस्वस्थ करून बसले आहेत. सत्ता हाच आपल्या जगण्यातला परमोच्च बिंदू आहे, अशा तडफेने नेतेमंडळींची वाटचाल सुरू आहे. यात त्यांची समाजसेवा किती आणि स्वार्थभाव किती हे न कळण्याइतकीही जनता आता खुळी राहिलेली नाही

मतदारांनी दिलेल्या अमूल्य मताची किंमत कशी करायची यांचे सारे धागेदोरे आपण त्यांच्या हाती सोपवलेले असतात आणि त्यामुळे आपल्या अमूल्य मताचे पुढे काय होते? आपण दिलेल्या मताला काही 'किंमत' ठरते का? कोण कोणत्या पक्षात कधी उडून जातो त्याचा पत्ताच लागत नाही आणि आपण निवडून दिलेला उमेदवार नेमका विरोधातल्या गटात सामील होतो. सध्या महाराष्ट्रातले राजकारण होळीतल्या धुळवडीसारखे भासू लागले आहे. तर समाजातील सामान्य लोकांची मन:स्थिती जत्रेत हरवलेल्या लहान मुलासारखी पोरकी वाटू लागली आहे. सध्याच्या महाराष्ट्राच्या सत्ता स्पर्धेत राष्ट्रवादीचे अजितदादा पवार आपले विरोधी पक्षनेतेपद सोडून सत्तेत सामील झाले आहेत. त्यांनाही बहुमानाने उपमुख्यमंत्री पद देऊन राज्य कारभारात सामील करून घेण्यात आले आहे.

### देवेंद्रपंतांचं पंचामृत अजितदादांच्या हाती

पंचामृत म्हणजे दही दुध तूप मध आणि साखरेचे मिश्रण. देवपुजेनंतर तीर्थ म्हणून ते सेवन केले जाते. याच पंचामृत संल्पनेवरच यंदाचा राज्याचा अर्थसंकल्प.आधारित आहे आणि तो सादर केलाय अर्थमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी. बदलत्या राजकीय समीकरणात आता अर्थ खाते अजित पवार यांच्याकडे आले. त्यामुळे पंचामृत जरी फडणवीस यांनी तयार केले असेल तरी त्यातील तरतुदींनिसार निधी वाटप करण्याची जबाबदारी पवार यांच्या हाती आहे.

### अजितदादांची कुंडली काय सांगते?

अजितदादा यांना सध्या ग्रहमान त्रास देत आहेत. गोचर शनिचा वक्री प्रवास कौटुंबिक कलह दाखवत आहे. गोचर शनिचा मंगळ प्लुटोशी होणारा प्रतियोग यातून भावनिक मतभेद होतील. विशेषत: भावंडाच्या बाबतीत तात्पुरती कटूता निर्माण होईल. चतुर्थात गुरु राहू चांडाळ योग व तो दशमातील रवी बुधाशी केंद्रयोग करीत आहे. कामात काहीशा अडचणी निर्माण होतील. सध्या बुध महादशेत राहूची अंतर्दशा अडचणी निर्माण करेल. एकूण सध्या उपमुख्यमंत्रीपदावर समाधान मानून लोकांची कामे करून लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करणे, हेच त्यांच्यासाठी खूप महत्वाचे ठरेल.

### एकनात शिंदेंना त्रास जाणवेल

सध्या एकनाथ शिंदे यांच्या पत्रिकेत अष्टमात सिंह राशीत मंगळ प्रवेश झाला आहे आणि त्यांच्या मूळ पत्रिकेत कुंभ राशीत शनी आहे आणि गोचर शनीही सध्या वक्री अवस्थेत येऊन बसला आहे. चतुर्थात गुरु राहू चांडाळ योग एकूण मंगळ शनी प्रतियोग आणि राहूच्या महादशेत केतूची महादशा २७ जुलै २०२३ पर्यंत आहे. एकूण अशा स्थितीतून जात असताना चढाओढ प्रतिस्पर्ध्यांकडून त्रास जाणवेल तर कार्यकर्त्यांकडून होणाऱ्या चुकांनाही दुसरीकडे सामोरे जावे लागेल. एकूण त्यांनी भावनेपोटी कोणतेही निर्णय सध्या घेऊ नयेत. त्याचवेळेस राजनैतिक हानी होणार नाही, याचीही काळजी घ्यावी. एकनाथ शिंदे सत्तेत राहतील, असे दिसते आहे. इथे मात्र एक 'पण' आहे. 'पण'शी संबंधित असलेली ग्रहस्थिती मात्र त्रासदायक आहे,असे गुप्ते सांगतात.

### देवेंद्र फडणवीस लकी मॅन...

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सध्या भाजपचे महाराष्ट्रातील आक्रमक आणि धाडसी नेतृत्व आहे. त्यामुळे पक्ष संघटनेत सध्या त्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरेल. राज्यकारभारात गरज भासली तर ते अतिमहत्त्वाच्या पदावर नियुक्त होऊन कारभार सुरळीत चालवतील. देवेंद्र फडणवीस यांच्या पत्रिकेतील अतिमहत्त्वाच्या पदावर नियुक्ती होईल,अशी गुप्ते यांची भविष्यवाणी आहे.

■ सांगोला तालुक्यातील घेरडी येथील घटना

## दारुच्या नशेत पत्नीला घेऊन पतीही विहिरीत बुडाला

सुराज्य/सांगोला

पती-पत्नीच्या झालेल्या वादात व दारूच्या नशेत पतीने पत्नीला विहिरीत ढकलून देऊन स्वत: ही विहिरीत बडून पती-पत्नी मृत्युमुखी पडल्याची घटना मेटकरवाडी, घेरडी (ता. सांगोला) येथे घडली आहे.



या घटनेमध्ये सिद्धाराम सुभाष कारंडे (वय २८) व सोनाली सिद्धाराम कारंडे (वय २५, रा. मेटकरवाडी, घेरडी ता. सांगोला) हे पती-पत्नी मृत्युमुखी पडले आहेत. लक्ष्मण बाबू आलदर (रा. मेटकरवाडी, घेरडी (ता. सांगोला) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांच्या घराशेजारी त्यांच्या मेहुण्याचा मुलगा सिद्धाराम सुभाष कारंडे हा त्याची पत्नी सोनाली, तीन मुली असे त्याची आजीसह राहत होता. सिद्धाराम यास दारू पिण्याचे व्यसन होते. दिनांक १३ जुलै रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास त्यांच्या घराशेजारावरून शेजारी राहणारी सोनाली कारंडे हे त्यांच्या शेतात गेलेली दिसली. त्यानंतर त्याच्या पाठीमागून सिद्धाराम हाही गेला. त्यावेळेस तो दारू पिलेला होता. पती-पत्नीमध्ये वाद चालू होता. थोड्या वेळाने फिर्यादीही त्यांच्या पाठीमागे गेला असता सिद्धाराम हा सोनाली हिला शेतातील विहिरी जवळच मारहाण करत होता. या वादातच सिद्धाराम यांनी त्याची पत्नी सोनालीला विहिरीत ढकलून दिले. यावेळी फिर्यादीने पळत जाऊन विहिरीत उडी मारून सोनालीला वाचवण्याचा प्रयत्न करत होता. त्यावेळेस सिद्धाराम याने विहिरीत उडी मारली व आपल्या पत्नीचा पाय ओढून विहिरीतील पाण्यामध्ये नेले. फिर्यादीने आपला जीव वाचवण्यासाठी विहिरीच्या कडेवर आला. परंतु या वेळेमध्ये सिद्धाराम याने आपल्या पत्नीला पाण्यात बुडवले व स्वत:ही बुडून दोघांचा मृत्यू झाला. विहिरीला पायऱ्या नसल्यामुळे फिर्यादीलाही वर येता येत नव्हते. सायंकाळी सातच्या सुमारास लोकांच्या बोलण्याचा आवाज ऐकल्यानंतर फिर्यादी लक्ष्मण आलदर यांनी विहिरीतून आवाज दिला. आवाजावरून लोकांनी फिर्यादीस व पती-पत्नीचे प्रेतं विहिरीबाहेर काढले. या घटनेची फिर्याद लक्ष्मण अलदर यांनी सांगोला पोलिसात दिली आहे.

## जिल्हा राष्ट्रवादी बैठकीला तीन आमदार गैरहजर

### कार्यकर्त्यांची मात्र मोठी गदी; शरद पवार यांच्यामागे ताकद उभी करण्याचा बैठकीत ठराव

सुराज्य/सोलापूर

बंडाळीनंतर सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसची बैठक शनिवारी पक्षनिरीक्षक शेखर माने यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत नेते अजित पवार गटात तर पदाधिकारी आणि कार्यकेर्ते शरद पवार गटात असल्याचे चित्र दिसून आले. याबैठकीला सर्व तालुक्यातून मोठा प्रतिसाद मिळाला मात्र बैठकीकडे राष्ट्रवादीचे बबनदादा शिंदे, संजय शिंदे आणि यशवंत माने या तीन आमदारांनी पाठ फिरवली जिल्ह्यातील राष्ट्रवादीची ताकद शरद पवार यांच्या मागे उभी करण्याचा ठराव या बैठकीत करण्यात आला.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बंडखोरी नंतर महाराष्ट्रात शरद पवार आणि अजित पवार असे दोन गट राष्ट्रवादीचे झाले आहे. अजित पवार यांनी अनेक आमदारांना घेऊन शिंदे-फडणवीस सरकार मध्ये सामील झाले आहे. सर्व राष्ट्रवादीच्या नऊ आमदारांना मंत्रिपद मिळाली आहेत. यासंदर्भात सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी पक्षाचा आढावा घेण्यासाठी पक्षनिरीक्षक शेखर माने यांनी बैठक आयोजित केली होती. शनिवारी दुपारी छत्रपती संभाजी महाराज चौकातील फर्न हॉटेलच्या सभागृहात घेण्यात पार पडली. बैठकीस जिल्हाध्यक्ष बळीराम साठे, अभिजित पाटील, रमेश बारसकर शहराध्यक्ष भारत जाधव, पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्ष कविता म्हेत्रे, जिल्हा महिला अध्यक्ष सुवर्णा शिवपुरे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष जयमाला गायकवाड, महेश माने, प्रल्हाद काशीद, बिपिन करजोळे उपस्थित होते. बैठकीला सर्व ११ तालुक्यातील तालुकाध्यक्ष, पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मात्र मोहोळचे आमदार यशवंत माने, माढ्याचे आ.बबनदादा शिंदे, आणि करमाळ्याचे आमदार संजय शिंदे यांनी पाठ फिरवली. पदाधिकारी गेले म्हणून पक्षाला काही फरक पडत नाही एक गेला तर दुसरा येतो. त्यामुळे येणाऱ्या २०२४ मध्ये पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली एक नंबर वर राहील असा विश्वास व्यक्त करत सोलापूर जिल्ह्यातील कार्यकर्ते यांनी पवारांच्या पाठीशी खंबीर उभे राहण्याचा निर्धार बैठकीत करण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात बंडखोरी झालेली नाही. जे गेले ते स्वार्थासाठी पक्ष सोडून गेले आहेत. आमचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे आणि तो शरद पवारांचा आहे त्यामुळे शरद पवारांवर आमचा विश्वास आहे. पक्षातील काही लोक बाहेर पडले असतील मात्र पक्षातील सामान्य कार्यकर्ता पदाधिकारी शरद पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून या पुढे काम करत राहणार आहे.

**- शेखर माने (निरीक्षक)**

भाजपने शिवसेना फोडली आता राष्ट्रवादी फोडली. इतर पक्षही फोडतील वाईट राजकारण करत आहे. आपण आता सावध होऊ काम केले पाहिजे भाजपचे राजकीय षडयंत्र हाणून पाडले पाहिजे शरद पवार यांच्या पाठीशी खंबीरपणे राहत शरद पवार यांची जिल्ह्यात ताकद दाखवू, जनता शरद पवार यांच्याच पाठीशी आहे. अजित पवार यांच्या विरोधात लढण्याची तयारी ठेवावी लागेल.

**- बळीराम काका साठे (जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस)**

## चांद्रयान-३ ची यशस्वी कक्षा बदलली

सुराज्य/नवी दिल्ली



चांद्रयान-३ची कक्षा यशस्वीपणे बदलली गेली आहे. आता त्याचे अंतर वाढवण्यात आले असून ते ४२ हजार किलो मीटर अंतरावर आहे. ही मोहिम ठरलेल्या नियोजनानुसार चालली असल्याचे इस्रोने सांगितले.


कक्षेत बदल झाल्यानंतर चांद्रयान-३ हे आता ४२ हजार किमीच्या ऑर्बिटवर पृथ्वीच्या भोवती फिरत आहे. चांद्रयान-३ला एमव्हीएम-३ एम ४ या रॉकेटच्या मदतीने पृथ्वीच्या अंडाकृती कक्षेत सोडम्यात आले होते. त्याचे पृथ्वीपासूनचे कमीत कमी अंतर १७९ किलो मीटर तर जास्ती जास्त अंतर ३६ हजार ५०० किमी असेल. हे अंतर ४२ हजार किमी पर्यंत वाढवले जाईल.

## चिंचोलीकाटी येथे टेम्पोच्या चाकाखाली चेंगरून चालक ठार

**सोलापूर :** चिंचोलीकाटी एमआयडीसी येथे टेम्पो रिव्हर्स घेताना चाकाखाली सापडल्याने शाहीद नजीर शेख (रा. चिंचोलीकाटी ता. मोहोळ) हा जागीच मयत झाला. हा अपघात शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडला. शाहीद शेख हा आपला चार चाकी टेम्पो चिंचोलीकाटी येथील इंडियन ऍग्रो कंपनीच्या बाजूला लाऊन टेम्पोच्या पाठीमागे झोपला होता. त्यावेळी चालकाने टेम्पो चालू करून रिव्हर्स घेतला. तेंव्हा मागच्या चार डोक्यावरून केल्याने शाहिद शेख हा जागीच मयत झाला. या घटनेची नोंद मोहोळ पोलिसात झाली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तुम्हाला कशाचे टेन्शन आलंय, चांद्रयान कि खाते वाटपाचे?

कल्याण

130-46-899

## प्रेझेंटेशन करणाऱ्यांना मूळ योजनाच माहित नाही : मोहिते-पाटील

सुराज्य/अकलूज

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आमचा पूर्णपणे विश्वास असून जे कोणी अलीकडील काळात समाज माध्यमासमोर योजनेचे प्रेझेंटेशन करत आहेत त्यांना मुळात योजनाच माहीत नसून या योजनेतून किती जिल्ह्यांना, तालुक्यांना पाणी मिळणार आहे. बोगद्यातून किती, उचल पाणी किती याचा अभ्यास नसल्याने केवळ स्टंटबाजीसाठी कोण तर प्रयत्न करीत आहे, गावाची नावे सुद्धा त्या व्यक्तिला माहीत नाहीत, अशी टीका खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचे नाव न घेता भाजपाचे संघटन सरचिटणीस धैर्यशील मोहिते पाटील यांनी केली.



अकलूज येथील शिवरत्न बंगला येथे प्रसार माध्यमांसमोर बोलताना त्यांनी हे मत व्यक्त केले. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की केवळ कृष्णा भीमा स्थिरीकरण योजनेचे स्वप्न साकार करण्यासाठी या एकाच लोककल्याणाच्या अटीवर आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील यांनी भाजपामध्ये प्रवेश केला. आणि तत्कालीन मुख्यमंत्री व आताचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कामी बैठक घेऊन तशा सूचनाही दिल्या व यासाठी ते पुरेपूर प्रयत्न करताना दिसत आहेत. या योजनेच्या प्रत्येक टेक्निकल बाबींमध्ये आमदार रणजितसिंह मोहिते पाटील हे सहभागी व सातत्याने यासाठी वरिष्ठ पातळीवर मागणी करताना दिसत आहेत स्टेप बाय स्टेप या योजनेची प्रोसेस चालू आहे विधान परिषदेच्या पटलावर हा विषय आहे.केवळ पश्चिम महाराष्ट्राचा हा प्रश्न नसून मराठवाडा देखील यामध्ये येत असल्याने असंख्य लोकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे त्यामुळे या प्रश्नासाठी सातत्याने आमदार रणजितसिंह मोहिते पाटील बैठका घेताना दिसत आहेत पण कोणीतरी ही योजना समजून न घेता केवळ स्टंटबाजी म्हणून समाज माध्यमासमोर बोलताना दिसत आहे. भारतीय जनता पार्टीने आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील यांच्यावर आमदारकीची जबाबदारी टाकली व माझ्यावर संघटन सरचिटणीस पदाची जबाबदारी टाकली यामध्ये आम्ही पूर्णपणे समाधानी आहे आणि पक्षाने भविष्यात कुठलीही जबाबदारी टाकली तरी त्यासाठी आम्ही तयार आहोत.



खासदारकी उमेदवारीच्या प्रश्नावर ते म्हणाले की, राजकारणात सर्वजण इच्छुक असतात पण पक्ष जी जबाबदारी देईल ती आम्ही सक्षमपणे पार पाडू.राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भारतीय जनता पक्षातील सर्वच वरिष्ठावर आमचा प्रचंड विश्वास आहे.आम्हाला कुठेही डावलले जात नाही. कृष्णा भीमा स्थीकरणाच्या प्रत्येक टेक्निकल गोष्टीमध्ये आमदार रणजितसिंह मोहिते पाटील आहेत.

## हॉलीवुड कलाकारांचे कामबंद आंदोलन

दिल्ली : हॉलीवुड चित्रपटसृष्टीवर सध्या संकटाचे ढग दाटले आहेत. कारण, या चित्रपटसृष्टीमध्ये काम करणारया कलावंत, कामगारांनी कामबंद आंदोलनाचे हत्यार उपसले असून, यामध्ये विविध संघटनांसह ऑस्कर पुरस्कार विजेत्या कलावंतांनीही सहभाग नोंदविला आहे. याचा परिणाम या संपूर्ण चित्रपटसृष्टीवर होत असून, यामुळे अनेक प्रोडक्शन हाऊस बंद होण्याच्या मार्गावर आहेत. ब्लुमर्ग या आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, हॉलीवूडचे लेखक आणि कलावंत हे एकाचवेळी ६३ वर्षानंतर पहिल्यांदा उपोषणास बसले आहेत. स्क्रीन एक्टर्स गिल्ड ही संस्था एक लाख ६० हजार कलाकारांचे प्रतिनिधीत्व करते. या संस्थेनेसुद्धा शुक्रवारी या संपात सहभागी होण्याचा निर्णय घेत आहे.

## लावणीचा शृंगार रसिकांपर्यंत पोहोचावा : पाटील

सोलापूर : लावणी महाराष्ट्राची संस्कृती असून राज्याच्या कलाक्षेत्रात लावणीला विशेष महत्व आहे.लावणी सादर करताना कलाकारांनी अदा,पदन्यास याकडे विशेष लक्ष देत लावणीला काय म्हणायचं आहे,यालाही कटाक्षाने पाहिले पाहिजे.लावणीचा शृंगार आणि सौंदर्य रसिकांपर्यंत पोहोचले पाहिजे,असे प्रतिपादन लावणी कलावंत आशिष पाटील यांनी केले.ते 'ढोलकीच्या तालावर' या कार्यक्रमाच्या प्रमोशनसाठी सोलापुरात आले होते,त्यावेळी त्यांच्याशी पत्रकारांनी संवाद साधला.कलर्स मराठीवर 'ढोलकीच्या तालावर' या कार्यक्रमाला सुरूवात झाली आहे.बिग बॉस मराठी पर्व चौथाचा विजेता अक्षय केळकर यांनी 'ढोलकीच्या तालावर' कार्यक्रमासाठी अँकरिंग करण्यासाठी दिलेली कमाल संधी असल्याचे सांगितले.

## प्रवीण तरडेंचा विनोदी अंदाज

सोलापूर : वैविध्यपूर्ण भूमिकांमधून लेखक, अभिनेता प्रवीण तरडेंनी त्यांची स्वत:ची वेगळी शैली निर्माण केली आहे.नेहम ीच दमदार भूमिकांमध्ये दिसणारे प्रवीण तरडे प्रथमच एका विनोदी भूमिकेत आपल्याला पहायला मिळणार आहेत.'दिनिशा फिल्म्स' निर्मित आणीबाणी' या मराठी चित्रपटात त्यांचा हा विनोदी अंदाज पहायला मिळणार आहे.हा चित्रपट २८ जुलै ला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## अभिनेत्री तेजस्विनी लोणारीचा 'अफलातून' डॅशिंग अंदाज

सोलापूर : मराठी सिनेसृष्टीतील ग्लॅमरस अभिनेत्री तेजस्विनी लोणारी हिचा बेधडक डॅशिंग अंदाज लवकरच पहायला मिळणार आहे.वेगवेगळया भूमिकांमधून प्रेक्षकांचे मनोरंजन केल्यानंतर तेजस्विनी पोलिसी गणवेश चढवत आगामी अफलातून' या मराठी चित्रपटात आलिया सावंत या डॅशिंग पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे.साहा अँड सन्स स्टुडिओज,आयडियाज द एंटरटेन्मेन्ट कंपनी निर्मित अफलातून' हा चित्रपट येत्या २१ जुलैला प्रेक्षकांच्या भेटीला येतोय.'अ डिफेक्टीव्ह कॅमेडी' असं म्हणत लेखक, दिग्दर्शक परितोष पेंटर यांनी हा धमाल विनोदी चित्रपट प्रेक्षकांसाठी आणला आहे.तेजस्विनी सांगते की,'माझं यातलं व्यक्तिमत्व गोवन आहे. शांत,संयमी पण वेळप्रसंगी आपला खाक्या दाखवत चोख कामगिरी बजावणारी पोलीस अधिकारी आहे.

# ३० जूनला सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना काल्पनिक वेतनवाढ देऊन सुधारित पेन्शन द्यावी

## सेवानिवृत्त शिक्षक संघाची मागणी

सुराज्य/सोलापूर



विहीत मुदतीत शिक्षकानी संगणक प्रशिक्षण पुर्ण न केल्याने सेवानिवृत्त शिक्षकांच्या पेन्शन मधून कपात केलेली रक्कम परत करावी अशी मागणी सोलापूर जिल्हा सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने शिक्षणाधिकारी संजयकूमार जावीर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शासनाने संगणक वसूलीला स्थगीती दिली आहे .तसे पुणे जिल्हा परिषदेने सेवानिवृत्ताकडून हमी पत्र घेऊन केलेली वसूली परत करण्याचे पत्र काढले आहे. या प्रमाणेच सोलापूर जिल्हा परिषदेनी ही पत्र काढावेत अशी मागणी सोलापूर जिल्हा सेवानिवृत्त शिक्षक संघाचे जिल्हाक्ष शिवानंद भरले सरचिटणीस मल्लीकार्जून बडदाळ ,कार्याध्यक्ष सुभाष फूलारी यांनी केले आहेत.

सोलापूर जिल्हा सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने शिष्टमंडळ शिषणाधीकारी संजय जावीर यांची भेट घेऊन सेवानिवृत्त शिक्षकाचे अडचणीवर चर्चा केली.

दिनांक ३० जूनला सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकाना एक काल्पनिक वेतनवाढ देऊन सुधारीत पेन्शन निश्चीत करावेत निर्धारित वेळेत संगणक प्रशिक्षण केले नाही म्हणून उपदानातून कपात केलेली रक्कम परत करावेत या वेळी मागणी केली आहे या संदर्भात शिक्षण विभागा कडून अर्थविभागाला प्रस्ताव सादर केली जाईल काल्पनीक वेतनवाढ बाबत सर्व गशिअना कळविण्यात आल्याचे शिक्षणाधिकारी जावीरसाहेब यानी सागितले.

तसेच ७ व्या वेतनाचे सर्व हप्ते, प्रॉव्हिडंट फंडाचे अंतिम बिले,उपादान व पेन्शन विक्रीचे रक्कम व इतर विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.यावेळी शिक्षणाधिकारी जावीर यांनी पेन्शनर्स शिक्षकांचे प्रश्न लवकरात लवकर सोडवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.यावेळी सांगोला तालुक्यातील .प्र.तु.कसबे, ना.पा कुलकर्णी .शं.ना.जाधव, .ह.शि.व्हसाळे, पं.सि. शावळ, .अं.भि. ईश्वरकट्टी, .रा.शं.कचरे, .कल्पना लालबोंद्रे, प्रतीभा अंदेवाडी, .सुनिता.संत अनेक सेवानिवृत्त शिक्षक शिक्षिका उपस्थित होते.

# बोगस बांधकाम परवाना प्रकरणी कठोर कारवाई व्हावी : आ. देशमुख

सुराज्य/सोलापूर



चुकीचे काम करणारे कोणीही असेल तर त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे, महापालिकेतील बोगस बांधकाम परवाना प्रकरणी तर दोषींवर कठोर कारवाई व्हावी आणि सोलापूरकरांनी कारवाई करणाऱ्या पालिका आयुक्तांच्या पाठीशी ठाम उभे राहावे, अशी अपेक्षा आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केली.

महापालिकेतील नगररचना व बांधकाम विभागात मोठा घोटाळा उघडली साला असून बोगस बांधकाम परवाने देणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांची टोळीच उघडकीस आली आहे. प्रकार इतका गंभीर आहे की पालिका आयुक्तांनी तात्काळ अधिकाऱ्यासह चौघांवर निलंबनाची कारवाई देखील केलेली आहे. यासंदर्भात बोलताना आमदार सुभाष देशमुख म्हणाले की चुकीची कृती करणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे परंतु चुकीचे काही होणार नाही यासाठी संपूर्ण सोलापूरकरांनी दक्षता घेणे गरजेचे आहे. चार अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करणाऱ्या पालिका आयुक्त शीतल तेली उगले यांचे अभिनंदनच आहे, अशी कारवाई करणाऱ्या आयुक्तांच्या पाठीशी सर्वांनी उभे राहिले पाहिजे. बोगस बांधकाम परवाना देणे आणि बोगस बांधकाम परवाने देणारी समांतर प्रशासकिय यंत्रणा तयार करणे हा गंभीर प्रकार असून याची चौकशी तर झालीच पाहिजे परंतु यातील दोषींवर पोलिस कारवाई देखील झाली पाहिजे. चुकीचे काम होणार नाही याची दक्षता सर्वांनी घेणे गरजेचे असल्याचेही ते म्हणाले.

# विधानसभेवर काँग्रेसचा तिरंगा फडकेल : प्रा. कुलकर्णी

सुराज्य/सोलापूर



अकलूज येथे आयोजित केलेल्या महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींचा उहापोह केला येणारे दिवसात काँग्रेसचा तिरंगा महाराष्ट्राच्या विधानसभेवर फडकेल असा विश्वास काँग्रेसचे राज्य प्रवक्ते प्रा. काकासाहेब कुलकर्णी यांनी व्यक्त केला.

सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने प्रतापगड अकलूज येथे सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होत, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सोलापूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष डॉ धावलसिंह मोहिते पाटील, जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष विजयकुमार हत्तुरे, जुगल किशोर तिवारी, ज्येष्ठ नेते अण्णासाहेब इनामदार शाहीन शेख, जिल्हा काँग्रेसचे सरचिटणीस राधाकृष्ण पाटील, शंकर सुरवसे, सागर कदम सर्व तालुक्याचे तालुकाध्यक्ष फ्रंटल अध्यक्ष, सर्व सेलचे अध्यक्ष उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धा १८ जुलैपासून

सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र बॅडमिंटन संघटनेतर्फे घेतल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धांकरिता सोलापूर जिल्ह्याच्या संघ निवडिकरिता घेतली जाणारी जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा यंदाच्या वर्षी १८ ते २० जुलै दरम्यान सुयश गुरुकुल येथील नव्याने उभारण्यात आलेल्या बॅडमिंटन संकुलात घेतली जाणार असल्याची माहिती सोलापूर जिल्हा बॅडमिंटन संघटनेचे अध्यक्ष श्री. जितेंद्र राठी यांनी दिली.

प्रतिवर्षी होणाऱ्या या स्पर्धेस यंदा केल्विनेटर या इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील अग्रणी कंपनीचे प्रायोजकत्व मिळाले असल्याने या वर्षी ही स्पर्धा केल्विनेटर अजिंक्यपद स्पर्धा या नावाने खेळविली जाईल.

दर वर्षी सोलापुरातील खेळाडूंकडून या स्पर्धेस भरभरून प्रतिसाद मिळतो, तसाच या वर्षी देखील मिळत असून सोलापूर शहरासह जिल्ह्यातील अक्कलकोट, पंढरपूर, बार्शी, मंगळवेढा, सांगोला या सर्वच तालुक्यातून खेळाडूंनी स्पर्धे करिता नोंदणी केलेली आहे, आत्ता पर्यंत विविध वयोगटातील २४० स्पर्धकांची नोंदणी झाली असून सर्व खेळाडूंची तयारी चांगली सुरू आहे, अशी माहिती संघटनेचे सचिव श्री. ओंकार दाते यांनी दिली आहे.

या स्पर्धा निष्पक्षपणे संपन्न व्हाव्यात या करिता राज्य व राष्ट्रीय स्तरावरील एकूण ६ पंच येणार असून सोलापूरचे सुपुत्र व आंतरराष्ट्रीय पंच असलेले संघटनेचे सदस्य श्री. शशांक कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा यशस्वी होईल असा विश्वास संघटनेचे उपाध्यक्ष श्री. मनोज मुलगे यांनी व्यक्त केला.

१८ ते २० जुलै दरम्यान सोलापूरकरांना उत्तमोत्तम सामने पाहता येणार आहेत, सर्व वयोगटातील अंतिम सामने दिनांक २० जुलै रोजी होणार आहेत, तरी सोलापुरातील क्रीडा प्रेमींनी आवर्जुन उपस्थित राहून हे सामने पहावेत व खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन सोलापूर जिल्हा बॅडमिंटन संघटनेच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



# पुण्यतिथी विशेष... | धन्य ते अरण, रत्नांचीच खाण। जन्मला निधान सावता तो।।

**सावता माळी हे एक मराठी संतकवी होते सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्या मध्ये अरण हे सावतोबांचे गाव होय. दैवू माळी हे सावता महाराजांचे आजोबा होते, ते पंढरीचे वारकरी होते त्यांना दोन मुले होती पुरसोबा आणि डोंगरोबा पुरसोबा हे धार्मिक वळणाचे होते शेतीचा व्यवसाय सांभाळून ते भजन–पूजन करीत असत, पंढरीची वारी करीत असत. त्यांचा विवाहही त्याच पंचक्रोशीतील सदू माळी यांच्या मुलीशी झाला. या दांपत्याच्या पोटी सावतोबांचा जन्म झाला. या घराण्याचे मूळ गाव मिरज संस्थानातले औसे होय. दैवू माळी (आजोबा) अरण या गावी स्थायिक झाले. भेंड हे गाव जवळच दोन मैलांवर आहे.**

सावता माळी यांनी भेंड गावचे भानवसे रूपम ाळी' हे घराणे असलेल्या जनाई नावाच्या मुलीशी लग्न केले. तिने उत्तम संसार केला. त्यांना विठ्ठल व नागाताई अशी दोन अपत्ये झाली. सावता माळी यांनी सेना न्हावी नरहरी सोनार यांच्याप्रम ाणेच त्यांनीही आपल्या व्यवसायातील वाक्प्रचार, शब्द अभंगात वापरले आहेत. तत्कालीन मराठी अभंगाच्या भाषेत नव्या शब्दांची, नव्या उपमानांची त्यामुळे भर पडली. सावता माळ्याचे अभंग काशीबा गुरव हा लिहून ठेवत असे.

संत सावता माळी यांच्या बद्दल संत नामदेव म्हणतात:-

धन्य ते अरण, रत्नांचीच खाण। जन्मला निधान सावता तो।।

सावता सागर, प्रेमाचा आगर। घेतला अवतार माळ्या घरी।।

संत सावतामाळी हे पंढरपूर जवळील अरणभेंडी या गावचे रहिवासी असून त्यांच्या वडिलांचे नाव परसूबा आणि आईचे नाव नांगीताबाई होते. त्यांच्या जीवनाविषयी माहिती सांगायचे झाले, तर ते अरणभेंडी गावातील रूपमाळी भानवसे यांची मुलगी जनाईशी त्यांचा विवाह झाला. त्यांना दोन अपत्ये होती. मुलगा विठ्ठल व कन्या नागाबाई ते गृहस्थाश्रमी असूनही विरक्त वृत्तीचे होते. ते पंढरपूरचे विठ्ठल यांचे अभंगाद्वारे व भक्ती द्वारे म हिमा गायत असत. त्यांचा वारकरी संप्रदायातील संत जनार्दनमध्येही मोठा लौकिक होता. विठ्ठल भक्तीने भरलेल्या त्यांच्या अभंग रचनांनी काव्याम ध्ये भक्तिभावानेचा मळा ते फुलवीत असतात. त्यांचे अभंग काही प्रमाणात उपलब्ध आहे.

साव' म्हणजे खरे तर शुद्ध चारित्र्य, सज्जनपणा. सावता हा भाववाचक शब्द होय. सभ्यता, सावपणा असा याचा अर्थ होतो. सावता महाराज लहानपणापासून विठ्ठलभक्तीमध्ये रममाण झाले. फुले, फळे, भाज्या आदी पिके काढण्याचा त्यांचा पारंपरिक व्यवसाय होता.


ऐहिक जीवनात कर्तव्यकर्मे करीत असतानाच काया-वाचे-मने ईश्वरभक्ती करता येते, हा अधिकार सर्वांना आहे. न लगे सायास, न पडे संकट, नामे सोपी वाट वैकुंठाची' असा त्यांचा रोकडा अनुभव होता. त्यांनी जनसामान्यांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखविला. यांना केवळ ४५ वर्षांचे आयुष्य लाभले. धार्मिक प्रबोधनाचे व भक्तिप्रसाराचे कार्य त्यांनी निष्ठेने व्रत म्हणून आचरिले. समरसता आणि अलिप्तता यातील विलक्षण समतोल त्यांच्या व्यक्तिमत्वात प्रकर्षाने जाणवतो. त्यांचे केवळ ३७ अभंग उपलब्ध आहेत. अरण येथे आषाढ वद्य चतुर्दशी, शके १२१७ (दि. १२ जुलै, १२९५) रोजी संत सावता महाराज अनंतात विलीन झाले. आजही पंढरपूरच्या श्री विठ्ठलाची पालखी वर्षातून एकदा खास त्यांना भेटावयास येत असते.

अरण येथे आषाढ वद्य चतुर्दशी, शके १२१७ (दि. १२ जुलै, १२९५) रोजी संत सावता महाराज अनंतात विलीन झाले असे मानले जाते. परंतु या दिनांकाविषयी भेद् आहेत असे कळते. कालनिर्णय दिनदर्शिकेत सावता माळी यांची पुण्यतिथी २५ जुलै अशी दर्शवली आहे.

सावता माळी हे कर्तव्य आणि कर्म करीत राहणे हीच खरी ईश्वारसेवा अशी प्रवृत्तिमार्गी शिकवण देणारे संत आहेत. वारकरी संप्रदायातील एक श्रेष्ठ आणि ज्येष्ठ संत म्हणून त्यांचा लौकिक आहे. श्री विठ्ठल हेच त्यांचे परमदैवत होते. ते कधीही पंढरपूरला गेले नाहीत. प्रत्यक्ष पांडुरंगच त्यांना भेटावयास आले. ते कर्ममार्गी संत होते. कर्मे ईशु भजावा' हीच त्यांची वृत्ती होती.पंढरपूरच्या विठ्ठलाची पालखी वर्षातून एकदा खास त्यांना भेटावयास येत असते.

अध्यात्म आणि भक्ती, आत्मबोध आणि लोकसंग्रह, कर्तव्य आणि सदाचार याची बेमालूम सांगड त्यांनी घातली. धर्माचरणातील अंध:श्रद्धा, कर्मठपणा, दांभिकता व बाह्य अवडंबर याबाबत त्यांनी कोणाचीच भीडभाड ठेवली नाही. त्यावर सतत कोरडे ओढले. अन्त:शुद्धी, तत्त्वचिंतन, सदाचार, निर्भयता, नीतिमत्ता, सहिष्णुता इत्यादी गुणांची त्यांनी भलावण केली. ईश्वराला प्रसन्न करून घ्यावयाचे असेल तर योग-याग-जप-तप, तीर्थव्रत, व्रतवैकल्ये या साधनांची बिलकूल आवश्यकता नाही. केवळ ईश्वराचे अंत:करणपूर्वक चिंतन हवे आहे.

आपल्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी संत सावता हे आपल्या शेतात दिवसभर कष्ट करीत असत. तसेच त्याचबरोबर ते ईश्वरभक्ती सुद्धा करत असत आणि ईश्वरभक्तीचा हा अधिकार सर्वांना आहे.




न लगे सायास न पडे संकट, नामे सोपी वाट वैकुंठाची

असा त्यांचा रोकडा अनुभव होता. त्यांनी जनसामान्यांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखविला होता. काशीबा गुरव नावाचे व्यक्ती त्यांचे अभंग लिहून ठेवत असत आपल्या मळ्यातील भाजीपाल्याम ध्ये ही त्यांना विठ्ठलाचे रूप दिसते.

आमची माळीयाची जात । शेत लावू बागाईत ।
कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ।।
लसूण मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ।।

या अभंगांमध्ये संत सावतामाळी म्हणतात की, आमची जात माळी आहे आणि आम्ही आमच्या शेतामध्ये कांदा, मुळा, भाजी, लसूण कोथिंबीर आणि मिरची अशी बागायत शेतीम ध्ये पीक घेत असतो आणि त्या मध्येच आम्हाला देव दिसतो. देवाला पाहण्यासाठी मंदिरांम ध्ये जाण्याची गरज नाही, आपल्या कामांमध्ये देव असतो हेही त्यांना सांगायचं आहे. अध्यात्म भक्ती आणि आत्मबोध आणि लोकसंग्रह कर्तव्य आणि सदाचार याची बेमालूम सांगड त्यांनी घातली. धर्म चरणातील अंधश्रद्धा कर्मठपणा दांभिकता यावर त्यांनी कोणाचीच ठेवली नाही. त्यावर सतत कोरडे ओढले अंतर शुद्धी तत्त्वचिंतन सदाचार निर्भयता नीतिमत्ता संशोधन इत्यादी गुणांनी त्यांनी ईश्वराला प्रसन्न करून घ्यायचे असेल तर योग्य तीर्थव्रत, कौशल्य या साधनांची बिलकूल आवश्यकता नाही. केवळ ईश्वराचे अंतःकरणपूर्वक चिंतन करणे किंवा नामस्मरण करणे यातच देव प्रसन्न होतो असे त्यांचे मत होते.

संत सावता माळी यांच्या विषयी एक आख्यायिका आहे की, संत सावतामाळी हे आपल्या शेतामध्ये खुरप्याने शेतातील काम करत होते. एकदा संत ज्ञानेश्वर, नामदेव आणि पांडुरंग असे तिघे कूर्मदास नावाच्या एका संताच्या भेटीला चालले होते. वाटेत सावतामाळी यांचे गाव अरणभेंडी लागली. तेव्हा पांडुरंगाने तुम्ही येथे थांबा, मी स्वतः भेटून येतो असे सांगितले. पांडुरंगाला गंमत करण्याची लहर आली, तो धावत धावत सावता माळ्याकडे गेला आणि म्हणाला म ाझ्या मागे दोन चोर लागले आहेत. मला कुठेतरी लपवून ठेव.

संत सावता यांनी बाल रुपी पांडुरंगाला खुरप्याने आपली छाती फाडून हृदयामध्ये लपून ठेवले आणि वरून उपकरणे किंवा कांबळे बांधले. ज्ञानेश्वर आणि नामदेव पांडुरंगाची वाट पाहून थकले आणि पांडुरंगाला शोधत सावता माळ्याच्या मळ्यापर्यंत आले. त्यांनी पांडुरंग कुठे आहे याची चौकशी केली. ज्ञानदेव आणि नामदेव दोघेही ज्ञानी होते. त्यांना सावत्याच्या पोटापाशी पांडुरंग आहे. हे समजले आणि मग सावता माळी यांना बरोबर घेऊनच हे तिघेही कुर्मदासला भेटायला गेले. या कथेत एक असा अंतरंगात भाग आहे की सावता माळी यांनी आपले पोट चिरुन आत पांडुरंगाला ठेवले.

ही कथा सत्य सत्याच्या कसोटीवर तपासून पाहणे शक्य नसले, तरी पोट चिरुन आत पांडुरंगाला ठेवण्याइतपत ताकदची काही गरज आहे असे वाटत नाही. संत सावता माळी आणि पांडुरंग यांचे अगदी जवळचे संबंध होते. एवढे जाणता आले तरी पुष्कळ आहे. संत सावतामाळी हे आपल्या दैनंदिन कामकाजात विठ्ठलाचे रूप पाहत असत. त्यांच्या सासरवाडीचे लोक एकदा त्यांच्याकडे आले. सावतामाळी भजनात रंगून गेले होते. त्यांनी सासरवाडीच्या लोकांकडे लक्ष दिले नाही. पत्नी संतापली त्यावेळी त्यांनी आपल्या पतीला जो उपदेश केला तो असा की,

प्रपंच असुनी परमार्थ साधावा । वाचे आठवावा पांडुरंग ।

उंच नीच काही न पाहे सर्वथा । पुराणींच्या कथा पुराणीच ।।

घटका आणि परत साधी उतावीळ । वाउगा तो काळ जाऊ नेदी ।।

सावता म्हणे कांती जपे नामावळी । हृदय कमळी पांडुरंग ।।

आपल्या कामातच देव पाहणारे काम हाच देव परमेश्वर अशी दृढ श्रद्धा बाळगणारे आणि स्वतः च्या पत्नीसह हे अधिकार वाणीने परमार्थाचा उपदेश करणारे, सावतामाळी त्यांच्या काळात महाराष्ट्राच्या भक्तीच्या मळ्याची मनोभावे जपणूक करीत होते.

लोकप्रिय अभंग

आमची माळियाची जात, शेत लावू बागाईत'
कांदा मुळा भाजी अवघी ।विठाबाई माझी''
''लसुण मिरची कोथंबिरी । अवघा झाला माझा हरि ।।'

अनासक्त वृत्तीने ईश्वरार्पण बुद्धीने केलेला प्रपंचच परमार्थ होतो, हीच त्यांची जीवननिष्ठा होती. त्यांना मोक्ष-मुक्ती नको होती. वैकुंठीचा देव आणू या कीर्तनी' ही त्यांची प्रतिज्ञा होती

स्वकर्मात व्हावे रत, मोक्ष मिळे हातो हात।'

सावत्याने केला मळा। विठ्ठल देखियला डोळा।'

या ओळींतून त्यांची जीवननिष्ठाच स्पष्ट होते. त्यांच्या अभंगांत नवरसांपैकी वत्सल, करुण, शांत, दास्य-भक्ती हे रस आढळतात. सावतोबांची अभंगरचना रससिद्ध आहत

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## जनआधार फाऊंडेशनच्या शिबीरात १३६ रक्तदात्यांचे रक्तदान

**सोलापूर** : सामाजिक कार्यकर्ते आनंद गोसकि यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी, १४ जुलै रोजी जनआधार फाऊंडेशनच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात १३६ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून आनंद गोसकि यांना शुभेच्छा दिल्या. आमदार विजयकुमार देशमुख यांनीही या शिबिरास भेट दिली. यावेळी शुभेच्छा देण्यासाठी गणेश गुज्जा, भाजपा जेष्ठ नेते रामचंद्र जन्नू, तुळशीदास भुतडा, लक्ष्मिकांत दंडी, दादा सरवदे, शिवराम भोसले, मोहन भुमकर यांच्यासह अनेक मान्यवरांनी रक्तदान शिबीरास भेट देऊन शुभेच्छा दिल्या, या प्रसंगी शहराच्या विविध भागातून आलेल्या युवकांनी स्वयंस्फूर्तीने मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान केले. सर्व रक्तदात्यांचे जनआधार फाऊंडेशनच्या वतीने आनंद गोसकि यांनी आभार मानले. सिध्देश्वर ब्लड बँकेचे डॉ. कोडे, आकाश बेरे, जनआधार फाऊंडेशनकडुन महेश दासी, शुभम मिठ्ठा, शंकर म्हंता, किरण आंबट, संतोष क्यातम, श्रीकांत येमुल, तुषार कामुर्ती, अरूण आडम, मधुकर सारंगी, दिलीप मुमुडले, दिनेश श्रींकोंडा, मधुकर बल्ला, आकाश बुर्ला, महेश दासी, उमेश जिल्ला, तुषार कामुर्ती, ऋषिकेश चिलवेरी, माधवचार्य कोटा आदी अन्य युवक बहुसंख्येने उपस्थित होते.



## न्यू हायस्कूल प्रशालेचे शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत नेत्रदीपक यश

**सोलापूर** : न्यू हायस्कूल सलगरवाडी प्रशालेतील इयत्ता पाचवीच्या विध्यार्थ्यांनी शासनाच्या शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत यश मिळवले. आकांक्षा शंकर जाधव व स्नेहा सचिन वाटमकर हे गुणवत्ता यादीत डोणगाव केंद्र, उत्तर तालुक्यात चमकले. तसेच राजनंदिनी पंकज राठोड, आरोही मोती जाधव, निशा मुकेश गवळी ,प्राची परशुराम गायकवाड, कृष्णा वाघमोडे, गौरव कराळे हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले प्रशालेचा निकाल शंभर टक्के लागला. प्रशालेचे सहशिक्षक अवधूत बोकडे,कोरे, संगीता मस्के, शांता राठोड यांचे मार्गदर्शन लाभले.प्रशालेचे पर्यवेक्षिका रोहिणी गायकवाड, मुख्याध्यापक कार्तिक चव्हाण यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. मागास समाजसेवा मंडळाचे अध्यक्ष सुभाष चव्हाण,सचिव किरण चव्हाण उपाध्यक्ष विवेक चव्हाण, केंद्रप्रमुख कोळी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

## लक्ष्मीनगरचे मुख्याध्यापक कोल्हे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जि प प्राथमिक शाळा लक्ष्मीनगर शाळेचे मुख्याध्यापक सुहास कोल्हे सर यांना प्रसन्न फाऊंडेशनचा स्पर्धा परीक्षेत दैदीप्यमान कार्य केल्याबद्दल दीपस्तंभ प्रेरणादायी शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार १३ ऑगस्ट रोजी सहकार महर्षी शंकरराव मोहीते पाटील स्मृतीभवन अकलुज याठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीत देणयात येणार असल्याचे फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष नवनाथ धांडोरे यांनी सांगितले. सुहास कोल्हे सर यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल माळशिरस पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख, जिल्हा नियोजन समिती सदस्य के के पाटील, पिलीव जि प गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशदादा पाटील, कुसमोडचे सरपंच पुरुषोत्तम धायगुडे, उपसरपंच स्वाती मदने,माजी सरपंच तुषार लवटे, माजी उपसरपंच व शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष संजय पाटील ,सर्व शाळा व्यवस्थापन समितीचे आजी माजी पदाधिकारी यांच्या कडून अभिनंदन व कौतुक होत आहे.

## मोटारसायकलच्या धडकेत पती-पत्नी जखमी ; एकावर गुन्हा

**सोलापूर** : मोटारसायकलीच्या धडकेत पती-पत्नी जखमी झाल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी मुबारक नबीलाल शेख (वय-४१,रा.सहारा नगर होटगी रोड) हे व त्यांची पत्नी कमरुनिसा असे एमएच.२३.एएम.७९९७ या मोटारसायकली वरून जात असताना फिर्यादी यांच्या पाठीमागून येणाऱ्या मोटारसायकल वाहन क्र.एमएच.१३.सीके.०७८३ या क्रमांकाचा वाहनचालक शशिकांत जाधव (रा.इंद्रधनु अपार्टमेंट,डोणगाव रोड) याने भरधाव वेगात मोटरसायकल चालून फिर्यादी यांच्या मोटारसायकलीला पाठीमागून जोरात धडक देऊन फिर्यादी व त्यांच्या पत्नीस दुखापत करण्यास कारणीभूत झाला आहे.तसेच फिर्यादी यांच्या मोटारसायकलीचे नुकसान करून अपघाताची खबर न देता पळून गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.याप्रकरणी मुबारक शेख यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून शशिकांत जाधव यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कुलकर्णी हे करीत आहेत.

## चोरट्याने घरासमोरून दुचाकी पळवली

**सोलापूर** : घरासमोर हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्र.एमएच.१३.एवाय.४४५४ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना १३ ते १४ जुलै दरम्यान घोंगळे वस्ती भवानी पेठ येथे घडली.याप्रकरणी प्रभाकर कोमरय्या सिंगरल (वय-६७,रा. घोंगडे वस्ती) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास मपोह.जाधवर या करीत आहेत.

## लक्ष्मण दर्शने यांचे निधन



**सोलापूर** : कै. लक्ष्मण (सुरेश) गंगाधर दर्शने वय ७८ यांचे शनिवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनीच्या कामास गती

**सुराज्य/सोलापूर**

**सोलापूर शहराची जीवनदायीनी मानल्या जाणाऱ्या उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनीच्या कामाला आता गती मिळाली आहे. पाईपही आवश्यकतेनुसार उपलब्ध होत आहेत. आतापर्यंत पोचमपाड कंपनीकडून दीड किलोमीटरचे काम पूर्ण झाले आहे. या कामासाठी सध्या रोज तीन गाड्या पाईप येत आहेत. एका गाडीमध्ये ४८ मीटरचे पाईप येतात. एका पथकाकडून रोज ४० मीटरचे काम करण्यात येत आहे. सध्या चार पथके कार्यरत आहेत. साधारणता: रोज १५० मीटरचे काम करण्यात येत आहे. पथके वाढवून एका वर्षात हे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.**

सोलापूर स्मार्ट सिटी कार्पोरेशनच्या सीईओ शितल तेली - उगले यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक अडथळयांची शर्यत पार करून सोलापूर शहराची जीवनदायीनी मानल्या जाणाऱ्या उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम अखेर सुरू करण्यात आले आहे. हैदराबादच्या पोचमपाड कंपनीला या कामाचा मक्ता ६१५ कोटीला देण्यात आला आहे. ११० किलोमीटर लांबीचे आणि १७० एमएलडी क्षमतेचे हे जलवाहिनीचे काम आहे. हे काम १८ महिन्यात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. ट्रायलसाठी तीन महिने असे एकूण २१ महिन्यांमध्ये प्रत्यक्षात प्रकल्प सुरू करण्यात येईल. या कंपनीने कामही सुरू केले आहे. कालबध्द चार्ट (बार चार्ट )प्रमाणे नियोजनपूर्वक हे काम हाती घेण्यात आले आहे. किती वेळेत किती काम संपवायचे याबाबत सर्व नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

## चार पथके कार्यरत; एका पथकाकडून रोज १५० मीटरचे काम
## पथके वाढवून वर्षात काम पूर्ण करण्याचे टार्गेट



**अशी आहे कार्यरत यंत्रणा**

उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनी टाकण्याच्या या महत्त्वपूर्ण कामासाठी सध्या एकूण चार पथके कार्यरत आहेत. एक ब्रेकर, एक पोकलेन, आठ कर्मचारी यासाठी कार्यरत आहेत. आवश्यकतेनुसार पथके वाढवून हे काम मार्गी लावण्यात येणार आहे.

दर आठवड्याला झालेल्या कामाचा आढावा स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनचे चेअरमन असीम गुप्ता आणि सीईओ शितल तेली - उगले यांच्याकडून दर शुक्रवारी घेतला जात आहे. व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे चेअरमन गुप्ता हे या कामाचा आढावा घेत आहेत. शुक्रवारी हे सीईओ शितल तेली - उगले यांनी या कामाचा सविस्तर आढावा घेतला. आवश्यक त्या सूचना दिल्या.

सध्या चार पथके कार्यरत आहेत. साधारणता: रोज १५० मीटरचे काम करण्यात येत आहे. दरमहा सुमारे दहा किलोमीटरचे काम होईल. पथकेके वाढवून एका वर्षात हे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचे स्मार्ट सिटीचे मुख्य तांत्रिक अधिकारी व्यंकटेश चौबे यांनी सांगितले.

# शहर गुन्हे शाखेकडून घरफोडीचे नऊ गुन्हे उघडकीस

## १३.५ तोळे सोने व ३८.७ तोळे चांदीचे दागिने हस्तगत

**सुराज्य/सोलापूर**

गुन्हे शाखेच्या पोलिसांनी एका महिलेसह तिघांना अटक करत त्यांच्याकडून घरफोडीचे नऊ गुन्हे उघडकीस आणले आहेत. यात १३.५ तोळे सोने व ३८.७ तोळे चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले आहे.

गुन्हे शाखेच्या सपोनि संदीप पाटील यांच्या पथकाला मिळालेल्या माहितीवरून संशयित महिला ही अशोक चौक परिसरात चोरीतील दागिने विकण्यासाठी येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी सापळा रचून करिष्मा राजू ऊर्फ गुड्या पवार ( वय २०, रा. पेनुर, मोहोळ) या महिलेला अटक केली. तिच्याकडे चौकशी केल्यानंतर तिने जानेवारी ते जून दरम्यान शहरातील तीन पोलिस ठाण्यांत सात घरफोड्या केल्याचे सांगितले. घरफोडीच्या पूर्वी ते बंद घरांची रेकी करत होते, त्यानंतर पती व इतर साथीदारांच्या माध्यमातून घरफोडी करत होते. यात फौजदार चावडी पोलिस ठाणे हद्दीतील ३, विजापूर नाका पोलिस ठाणे हद्दीतील २ व जोडभावी पेठ पोलिस ठाणे हद्दीतील २ गुन्हे उघडकीस आले आहेत. याप्रकरणी एकूण ७ लाख ९४ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

ही कामगिरी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील, विजयकुमार वाळके, राहुल तोगे, प्रकाश गायकवाड, सचिन होटकर, विद्यासागर मोहिते, तात्यासाहेब पाटील, गणेश शिंदे, सुभाष मुंढे, विठ्ठल यलमार, वसीम शेख, सिध्दराम देशमुख, अजय गुंड, अर्चना स्वामी, शिलावती काळे, निलोफर तांबोळी, ज्योती लंगोटे, सुमित्रा बोरबोले, रत्ना सोनवणे, प्रकाश गायकवाड, सतीश काटे यांनी केली.




दुसऱ्या घटनेत सपोनि जीवन निरगुडे यांच्या पथकाला मिळालेल्या माहितीच्या आधारे शाहनवाज नासिर जहागीरदार याला विजापूर नाका पोलिस ठाणे हद्दीत घरफोडी केल्याप्रकरणी अटक करून त्याच्याकडून ३८ हजार ३७० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे सपोनि संजय क्षीरसागर यांच्या पथकाला मिळालेल्या माहितीच्या आधारे राहुल ऊर्फ गुडभ्या ऊर्फ अण्णा मिंटर पारधी (रा. मध्य प्रदेश) यास सलगरवस्ती पोलिस ठाणे हद्दीतील घरफोडी गुन्ह्यात अटक करून त्याच्याकडून १० हजार किमतीचा मोबाइल जप्त करण्यात आला आहे.

## पिलीव आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारीपदी डॉ. विलास जाधव

**सुराज्य/पिलीव**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकिय आधिकारी पदी डॉ विलास जाधव यांची नुकतीच नियुक्ती झाली पिलीव येथील डॉ संतोष माने - देशमुख यांची माणकी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात बदली झाल्यावर डॉक्टर विलास जाधव यांची त्यांच्या जागी नियुक्ती झाली आहे.

याबद्दल पिलीव येथील सामाजिक संघटना आठवणी ९५ च्यावतीने डॉक्टर विलास जाधव यांचा सत्कार करण्यात आला यावेळी उमेश देशमुख, जयंत गोरे, सचिन गाटे, नितीन शिंदे,औषध विभागाचे विलास करे, लोखंडे मॅडम उपस्थित होते.



# जैन समाजाचा भर पावसात जिल्हाधिकारी कार्यालावर मोर्चा

## आचार्य यांच्या हत्येचा केला निषेध, जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**सुराज्य/सोलापूर**

प.पू.आचार्यश्री १०८ कामकुमारनंदी महाराज यांच्या निर्घृण हत्येच्या निषेधार्थ सोलापूर सकल जैन समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मुक मोर्चा काढण्यात आला.

कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यातील चिकोडी येथे प.पू.आचार्यश्री १०८ कामकुमारनंदी महाराज यांची निर्घृणपणे हत्या केली गेली. सदर घटनेच्या निषेधार्थ शुक्रवार शुक्रवारी १४जुलै रोजी दुपारी वाजता सर्व जैन समाज घटक, शैक्षणिक व सामाजिक संघटना,सर्व व्यापारी संघटना यांच्या वतीने सम्राट चौक येथील श्राविकाश्रम येथून मुक मोर्चा काढला.

प.पू. क्षुल्लक श्री १०५ ध्यानसागरजी महाराज, प.पू. साध्वी अर्हमप्रभाजी माताजी, यांच्या सान्निध्यात हा मुकमोर्चा काढण्यात आला. श्राविका आश्रम येथून निघालेला मोच्रा टेलीफोन भवन मार्गे मंगळवार पेठ पोलिस चौकी, मधला मारूती , माणिक चौक, विजापूर वेस, पंचकट्टा ते जि. प. पुनम गेट येथे मोर्चाचा समारोप केला. जिल्हाधिकारी मिलींद शंभरकर यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या मुकमोर्चात सकल जैन समाज सोलापूर यांच्या वतीने भारत वर्षीय दिगंबर तीर्थक्षेत्र कमिटीचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष व सकल समाजाचे कार्याध्यक्ष अनिल जमगे, ध्यानसागर महाराज,कालीचरण महाराज यांच्यासस हर्षवर्धन शहा, रणजित गांधी, अनिल जमगे,केतन शहा,पराग शहा, डॉ महावीर शास्त्री, शाम पाटील प्राचार्य सुकुमार मोहोळे, बाबुभाई मेहता कल्पेश मालू,मनीष शहा, किशोर मेहता,हर्षल कोठारी, पदम रांका, चेतन बाफना जितेंद्र बलदोटा सुधीर पंडित राजेंद्र देशमाने चारोकीर्ती शिरसोडे हर्षवधन बुबणे रवींद्र कटके विलास शहा संजीव पाटील प्राचार्य संतोष कोटी अरुण धुमाळ कोमल पाचोरे राजेंद्र शहा, ,सुनील गांधी , संजय कंदले,शिरीष चंकेश्वरा, आनंद तालिकोटी, देवेंद्र शटगार, संजय गांधी,अजितनाथ उपाध्ये, महेश नळे, वालचंद पाटील, देशभूषण व्हसाळे,अभिनंदन विभुते, विकास कंदले, सुकुमार वारे,अनुप कस्तुरे, सुहास छंचुरे, प्रसन्न गाडे, प्रदिप ढेरे, रोहन शहा, सुरज व्हसाळे, माणिकशेटे, सागर शिरशाड, बाहुबली शटगार, सचिन आळंद, माया पाटील कामिनी गांधी, मेघा गांधी सुजाता शहा सरिता कोठाडिया, पंकजा पंडित, प्रथमेश कासार सहभागी झाले होते.

# राज्य उत्पादनकडून ४ धाब्यांवर धाडी; चालकासह १५ ग्राहकांना अटक

**सुराज्य/सोलापूर**



राज्य उत्पादन शुल्कच्या पथकाने गुरुवारी शहर आणि जिल्हा परिसरात ४ धाब्यांवर धाड टाकून ४ धाबे चालका आणि ११ मद्यपी ग्राहकांना अटक केली. त्यापैकी ४ चालकांना प्रत्येकी २५ हजार तर ११ ग्राहकांना प्रत्येकी ३ हजार रुपये दंड अशी शिक्षा न्यायदंडाधिकारी नम्रता बिराजदार यांनी सुनावली .

राज्य उत्पादन विभागाकडून हातभट्टी दारू निर्मिती ठिकाणे व धाब्यांवर सातत्याने कारवाई करण्यात येत आहे.

त्या हैदराबाद रोडवरील हॉटेल स्वाद या ठिकाणी धाड टाकून हॉटेलचा चालक सुनील शंकर कांबळे (वय ३०) आणि त्या ठिकाणी दारू पीत बसलेले ग्राहक दत्ता सुधाकर लोंढे, सागर सुभाष सरवदे, वसीम मेहबूब नदाफ या चोघांना जागेवरच अटक केली. होटगी रोड मजरेवाडी येथील हॉटेल विकास या ठिकाणी धाड टाकून हॉटेल चालक सिध्दराम बालाजी मोरे (वय २९ ) आणि ग्राहक विजय हुचन्ना बनसोडे, स्वप्निल दगडू काळे आणि शिवराज धनप्पा कस्तुरे यांना अटक केली.

बसवनगर ते मंद्रूप रोड वरील हॉटेल एंजल या ठिकाणी धाड टाकून हॉटेल मालक मोतीलाल चीमलाल राठोड (वय ६५ ) ग्राहक अमोगसिध्द माळसिध्द मोगलाई, आकाश गुरुबाला उमराणी आणि, शिवराज श्रीमंत कोळी यांना अटक केली. या गुन्हयातील आरोपीना न्याय दंडाधिकारी नम्रता बिरादार यांनी हॉटेल चालक मालकास प्रत्येकी २५ तर मद्यपी ग्राहकांना प्रत्येकी ३ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली.

एका अन्य कारवाईत दुय्यम निरीक्षक पंढरपूर मयूरा खेत्री यांच्या पथकाने मोहोळ तालुक्यातील हिवरे गावातील हॉटेल तावजीराजे या ठिकाणी धाड टाकून ढाबा मालक तानाजी शिवाजी देवकते (वय ३५ ) दोन ग्राहक बबलू अब्दुल शेख आणि सुहास सुरेश कोकीळ यांना अटक केली होती . त्यांना मोहोळचे न्याय दंडाधिकारी पी.जी.महाळणकर मालकास २५ हजार तर ग्राहकांना प्रत्येकी ३ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली.

ही कारवाई राज्य उत्पादनचे अधीक्षक नितीन धार्मिक यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक राहुल बांगर, सदानंद मस्करे, किरण बिरादार, दुय्यम निरीक्षक उषाकिरण मिसाळ, कृष्णा सुळे, अक्षय भरते, मयुरा खेत्री, सहायक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, गजानन होळकर, जीवन मुंढे , जवान चेतन व्हनगुंटी , किरण खंदारे, प्रशांत इंगोले, इस्माईल गोडीकट, अनिल पांढरे , गणेश रोडे, प्रकाश सावंत, वाहनचालक रशिद शेख व रामचंद्र मदने यांच्या पथकाने पार पडली.

# मध्य रेल्वेने केला सौर क्षमतेचा विस्तार

**सुराज्य/सोलापूर**

मध्य रेल्वेने जून २०२३ पर्यंत अनेक स्थानकांवर सौर रूफटॉप प्लांट बसवून शाश्वत ऊर्जेच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

सौरऊर्जेचा वापर करणे आणि रेल्वेचे कार्बन फूटप्रिंट कमी करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. पुढे, स्वच्छ ऊर्जे प्रती आपली वचनबद्धता बळकट करत, मध्य रेल्वेने विविध ठिकाणी १ मेगावॅट सौरऊर्जा प्रकल्प विकसित करण्याचे कंत्राट मिळवले आहे.

मध्य रेल्वेने आपल्या नेटवर्कमध्ये ८१ ठिकाणी १ मेगावॅट सौरऊर्जा प्रकल्प विकसित करण्यासाठी कंत्राटे दिली आहेत. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प रेल्वेच्या सौरऊर्जा क्षमतेत आणखी वाढ करेल आणि त्याच्या कामकाजात शाश्वत पद्धतींना प्रोत्साहन देईल. असा विश्वास व्यक्त केला जातोय.



**रेल्वेच्या बिनकामाच्या किंवा वापरात नसलेल्या जमिनीवर सोलर प्लांट**

सोलर प्लांट बसवण्याच्या सोयीसाठी, मध्य रेल्वेने सुमारे २,६९४ एकर मोकळी किंवा वापरात नसलेली रेल्वे जमीन ओळखली आहे. या स्थानांमध्ये सौर पायाभूत सुविधांच्या विकासाची प्रचंड क्षमता आहे आणि त्यामुळे रेल्वेचा कार्बन फूटप्रिंट आणखी कमी होण्यास मदत होईल.


**येथे सौर रूफटॉप प्लांट आहेत:**

उस्मानाबाद - २० किलोवॅट,
बार्शी शहर - १५ किलोवॅट,
वाडसिंगे - १०किलोवॅट,
सलगरे - १५ किलोवॅट,
पारेवाडी - १० किलोवॅट,
मोहोळ - १० किलोवॅट,
तिलाती - १० किलोवॅट.



## कुसमोड येथील जि. प. शाळेत विद्यार्थ्यांना गणवेशांचे वाटप

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लक्ष्मीनगर येथील विदयार्थना आज मोफत गणवेशाचे वाटप करण्यात आले. या गणवेशाचे वाटप शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय पाटील, कुसमोड ग्रामपंचायतीच्या उपसरपंच स्वाती मदने, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य विजय मदने, सदस्या स्वाती गारुळे, पल्लवी मदने, मुख्याध्यापक सुहास कोल्हे, सहशिक्षक सुनील डुरे सर, अंगणवाडी सेविका सत्यभामा मदने पालक, दादा पवार, साठे, यांच्या हस्ते व सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.



## अन्नछत्र मंडळाकडून स्वामी भक्तांची होतेय नम्रसेवा : पो. नि. पोतदार

**अक्कलकोट** : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळाकडून स्वामी भक्तांची नम्रसेवा, परिसरातील स्वच्छता वसुंदराची जपणूक हे उल्लेखनी असल्याचे मनोगत मुंबई पोलीस विभागातील आर्थिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन पोतदार यांनी व्यक्त केलेते तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहपरिवार आले असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मुर्ती, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. त्यांच्यासमवेत संभाजीनगर येथील सातारा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रशांत पोतदार, सीआयडी सोलापूरचे पोलिस उपनिरीक्षक प्रवीण पोतदार हे देखील उपस्थित होते. याप्रसंगी न्यासाचे सचिव शामराव मोरे, पुरोहित संजय कुलकर्णी, एस.के.स्वामी, सिद्धाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, धानू उमदी, बाळासाहेब घाडगे, दत्ता माने, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे, शरद भोसले, चंद्रकांत हिबारे, संभाजीराव पवार, शिवू स्वामी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## महेश शेंडे यांना राज्य शासनाचा गुणवंत कर्मचारी पुरस्कार



**कुर्डूवाडी** : पंचायत समिती कुर्डूवाडी ता.माढा बांधकाम विभागाचे वरिष्ठ सहाय्यक महेश मधुकांत शेंडे यांना महाराष्ट्र शासनाचे ग्रामविकास विभागाने गुणवंत कर्मचारी म्हणून पुरस्कार जाहीर केला आहे.

राज्याच्या ग्रामविकास विभागाचे वतीने या वर्षी राज्यात विभागात क्षेत्रीय स्तरावर उत्कृष्ठ काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांना राज्यपाल व मुख्यमंत्री यांचे हस्ते पुरस्कार देऊन गौरविणेत येते. यंदाचा पुरस्कार पुणे विभागातून सोलापूर जिल्हयातून एकमेव महेश शेंडे यांना जाहीर करण्यात आला. विविध आठ प्रशंसनीय कामावर शासनाने अहवाल मागवून घेतला होता. राष्ट्रीय स्वच्छता अभियान, मतदान जागृती,वृक्षारोपण, लेखा परीक्षण,रक्तदान शिबिर, व्हॉटर कप स्पर्धा आदी कार्यालयिन प्रकरणातील संगणकीकरण, कार्यालय अभिलेख वर्गीकरण, शासनाचे योजनांची प्रभावी अंमलबजावणी, आषाढी यात्रा कालावधीत राबविणेत आलेले स्वच्छता व पाणी व इतर उपक्रम, सोशल मिडीयाचा विधायक वापर, वीस वर्षाच्या सेवेतील अतिउत्कृष्ठ गोपनीय अहवाल, प्रशासकीय कामकाजात गतीमान करणेसाठी महत्वपूर्ण काम केले आहे. कार्यालयीन कामकाजातील संगणकीकरण, अभ्यागत यांना आदराची वागणुक, समस्यांचा व अडचणींचा वेळेत निपटारा यामुळे त्यांची जनमानसात चांगली प्रतिमा निर्माण केली आहे.महेश शेंडे याचेकडे असलेली गुणवत्ता व कौशल्य याची दखल ग्रामविकास विभागाने घेतली आहे. शासन परिपत्रका द्वारे निवड जाहिर केली आहे. आमदार बबनदादा शिंदे,आमदार संजय मामा शिंदे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी,अति.मु. का.अ.संदीप कोहिणकार,उप मु.का.अ. इशाधिन शेळकंदे,गट विकास अधिकारी चिलवंत आर्दीनी अभिनंदन केले आहे.



## स्नेहा आणि सादियाला मार्ग फाउंडेशनचा मदतीचा हात

**सोलापूर** : सोलापूर जुळे सोलापूर येथील वसुंधरा कला महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या सादिया मुल्ला व स्नेहा निम्बर्गी या हुशार आणि गरजू विद्यार्थिनींना मार्ग फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अध्यक्ष श्री.संतोष पवार यांनी प्रवेश घेण्यासाठी रोख रक्कम ( शैक्षणिक / महाविद्याय फी ) स्वरूपात संपूर्ण मदत केली.

या दोघी राज्यस्तरीय खेळाडू आहेत, गुणवंत आणि होतकरू खेळाडूंना मदत करण्याच्या भावनेतून ही मदत केली गेली आहे आणि भविष्यात या दोन्ही विद्यार्थिनींचे शैक्षणिक दत्तकत्व हे श्री सातोष पवार यांनी स्वीकारले आहे.या प्रसंगी प्राचार्य डॉ. मीना गायकवाड यांनी या दोन्ही विद्यार्थिनींचे कौतुक करुन त्यांच्या हस्ते दोघींना रोख रक्कम प्रदान करण्यात आली. यावेळी मार्ग फाउंडेशन चे असिफ यतनाळ ,दत्ता पाटील , डॉ. सुहास उघडे हे उपस्थित होते.

# पावसाअभावी ऊसलागवड खोळंबली

## ऊस क्षेत्र घटण्याची शक्यता

सुराज्य/सोलपूर

**जवळपास दिड महिन्यापासून जिल्ह्यात पावसाने दडी मारल्यानं आडसाली ऊस लागवड खोळबंली आहे. याचा परिणाम म्हणून उसाच्या क्षेत्रात मोठी घट होण्याची शक्यता आहे. पावसाने हुलकावणी दिल्याने ऊस उत्पादक अडचणीत सापडले आहेत. शेतकऱ्यांच्या नजरा आता आभाळाकडे लागल्या आहेत.**

दरवर्षी आडसाली ऊस लागण मोठ्या प्रमाणात होते. तुरळक झालेल्या पावसावर शेतकऱ्यांनी धाडस करून आडसाली उसाच्या लागवडी केल्या. मात्र, त्यानंतर पावसाने उघडीप दिली आणि लागवडी खोळंबल्या. जिल्ह्यांतील नदीकाठच्या शेतकऱ्यांनी लागवड केली आहे. मात्र, आता येथील पीकही अडचणीत आले आहे. पाऊस झाला नाही तर नदीकाठच्या झालेल्या लागवडी धोक्यात येणार आहेत. माढा,पंढरपूर, माळशिरस सह इतर तालुक्यातील शेतकरी कॅनॉलच्या पाण्यावर ऊस शेती करतात. यातून मिळणाऱ्या पाण्यानुसार त्याचे आडसाली ऊस



लागवडीचे नियोजन करतात. मात्र, उजनी धरणक्षेत्रातच पाऊस नाही. धरण सध्या मायनस टक्केवारीत आले आहे तर कशी लागवड केली जाणार असा प्रश्न उपस्थित शेतकऱ्यांतून विचारला जावू लागला आहे.

**ऊसासह इतर पिके वाळू लागली**

गेल्या वर्षी चांगला पाऊस झाल्याने धरण, नद्यांना पाणी होते. यामुळे उन्हाळ्यात ऊस पिकांना याचा फायदा झाला, परंतु यंदा ऐन पावसाळ्यात पाणीटंचाईची झळ बसू लागली आहे. याचा परिणाम ऊस उत्पादनावर होण्याची शक्यता असल्याचे काही कारखान्यांच्यां सूत्रांनी सांगितली. तर बऱ्याच ठिकाणी ऐन पावसाळ्यात पाणी नसल्याने ऊस पिके वाळू लागली आहेत.याचा परिणाम आगामी येणाऱ्या गळीत हंगामात होणार आहे.यंदा आडसाली उसाची लागवड पावसाअभावी रखडली आहे. याचा परिणाम ऊस क्षेत्रावर नक्कीच होणार आहे.

### ३७ कारखान्याच्या हंगामावर परिणाम

सोलापूर जिल्ह्यातील वरदायिनी असणाऱ्या उजनी धरण व निरादेवधर च्या पाण्यामुळे शेतकरी ऊस दाळींब,द्राक्ष, केळी सह भाजिपाला पिके घेत आहे. जिल्ह्यात सहकारी व खाजगी असे एकूण ३७ कारखाने आहेत.यामुळे शेतकरी ऊस पिकाच्या लागवडीकडे मोठ्या प्रमाणात वळला असून यंदा जिल्ह्यात २ लाख ४० हजार हजार हेक्टर वर ऊस लागवड आहे. पावसाळ्यात पडणाऱ्या पाण्यामुळे ऊसाची वाढ चांगली होवून हेक्टरी उत्पादनात मोठी वाढ होते.मान्सूनचे आगमन होवून दिड महिना झाला तरी जिल्ह्यात पाऊसाने हुलकावणी दिली आहे.त्यामुळे उभी असणारी पिके जळू लागली आहेत. या आठवड्यात न पडल्यास जिल्ह्यातील २ लाख ४० हजार हेक्टरवरील ऊस पिक धोक्यात येणार असून याचा परिणाम साखर कारखान्यांच्या गळीत हंगामावर होणार आहे. तर शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन कोलमडून जाणार आहे.यामुळे शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसला आहे.

**शेतमजुरींच्या दरात वाढ.**

दरवर्षी ऊस लागवडीसाठी मजुरी वाढली जाते. यंदा मजुरी व मशागत खर्च रुपये असा (कंसात गेल्या वर्षीचा दर) एकरी लागण - ६००० (४०००), कट वाकुरी - १५०० (१०००), नांगरट, रोटर - २५०० (१६००), सरी सोडणे - २००० (१२००), दात्री, रेजर, कुळव - १६०० (१०००), भांगलण - एकपारकी - २०० (१५०), दुपारकी - २५० (२००), खत टाकणे प्रति पोते - ९० (५०) .

## विवेकानंद केंद्रातर्फे दहा दिवस योगसत्राचे आयोजन

सुराज्य/सोलापूर

जुळे सोलापूरच्या विवेकानंद केंद्रतर्फे १८ ते २८ जुलै दरम्यान सकाळी सहा ते साडेसात या वेळेत होटगी रोडवरील इंडस्ट्रियल इस्टेट सभागृहात योगिक सूर्यनमस्कार व आसने या योगसत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या सत्रामध्ये योगिक सूर्यनमस्कार व आसने याची शास्त्रीय माहिती व प्रात्यक्षिक वैयक्तिक लक्ष देऊन शिकवले जातील. त्यासाठी अनुभवी प्रशिक्षक मार्गदर्शन करणार आहेत.अधिक माहितीसाठी नंदकुमार चितापुरे (मो.९८२२०१८५५६) व दिपाली कुलकर्णी (मो.९%६५५%६६%१) यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शिबीरानंतर सर्व शिबीरार्थींना यापुढे रोज सकाळी सहा ते सात विनाशुल्क सरावासाठीयोगवर्गास येता येणार आहे.

## शेततळ्यात सापडला नाग

सुराज्य/सोलापूर



अकोलेकटी जवळ असलेल्या सोमनाथ नगर येथील शेततळ्यात पडलेल्या नागाला सर्पमित्रांनी मोठ्या कसरतीने बाहेर काढले.

एक भला मोठा साप प्रज्वल बोराडे यांना दिसून आला. त्यांनी सर्पमित्र सुरज बनसोडे यांना घटनेची माहिती दिली. पण सुरज बनसोडे हे बाहेर गावी असल्याने त्यांनी सोलापूरचे सर्प अभ्यासक राहुल शिंदे यांना माहिती दिली. काही वेळातच सर्प अभ्यासक राहुल शिंदे व सर्पमित्र अनिल अलदार हे घटनास्थळी दाखल झाले. जवळपास ३ एकरातील शेततळे ५० फूट खोल होते. शेततळ्यात पाणी सोडण्याची प्रक्रिया एक दिवसांपूर्वीच सुरू झाली होती. दुसऱ्या दिवशी शेततळ्यात पाणी सोडण्यासाठी आल्यानंतर बोराडे यांना हा साप दिसून आला. त्याला वर चढून शेततळ्या बाहेर येणे अशक्य होते. अलदार यांनी नागास एका मोठ्या बरणीमध्ये कैद केले.

## सरकारी कामात अडथळा; नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

सरकारी कामात अडथळा केल्याप्रकरणी नऊ जणांविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १३ जुलै रोजी दुपारी सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास जवाहर नगर येथे घडली.याप्रकरणी रामकृष्ण सावरय्या कोमल्लू (वय-५०,नोकरी- सोलापूर महानगरपालिका रस्ते विभाग भूमापक,रा. कल्याण नगर भाग २) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून शांतीलाल साबळे गणेश शिंदे यांच्यासह पाच ते सात अनोळखी साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,वरील संशयित आरोपी यांनी रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे सांगून, फिर्यादी यांना तुम्ही याबाबत नगर अभियंता साहेबाकडे तक्रार करा असे सांगितले.तेव्हा फिर्यादीस ते काम बंद करण्यास सांगून कामगारांना हुसकावून लावले.त्यानंतर फिर्यादी हे समजून सांगत असताना त्यांच्या हातातील संबंधित कामाचे कागदपत्रे,डायरी,मोबाईल हिसकावून घेऊन फेकून दिले व मारहाण करून दमदाटी केली.तसेच कंत्राटदार यांना खंडणी मागून फिर्यादी यांना मारहाण करून सरकारी कामात अडथळा केला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मुल्ला हे करीत आहेत.



## इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र

सुराज्य/नातेपुते

नातेपुते येथील एस.एन.डी. इंटरनॅशनल सीबीएसई इंग्लिश स्कूलने पहिल्याच वर्षात यशाची परंपरा जपत इयत्ता ५ वी पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत १७ विद्यार्थी पात्र ठरले असून या यशस्वी विद्यार्थ्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदे मार्फत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ .मध्ये घेण्यात आलेल्या पुर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ५ वी परीक्षेचा निकाल लागला असुन यामध्ये एस.एन. डी.इंटरनॅशनल सीबीएसई इंग्लिश मिडीयम स्कूलचे २९ विद्यार्थी परीक्षेस बसले होते.

त्यापैकी १७ विद्यार्थी पात्र झाले असून २ विद्यार्थी यामध्ये सुश्मित गावडे ( ३०० पैकी २५० ) राज्यात ३८ वा क्रमांक तर श्रींशा कोरटकर ( ३०० पैकी २२२ ) राज्यात १७६ वा क्रमांक मिळवला त्याबद्दल त्यांना शासनाकडून शिष्यवृत्ती मिळणार आहे. तसेच संस्कृती लंबाते हिने ( ३०० पैकी २०८ ) गुण मिळवून जिल्हा लेवल मध्ये विशेष प्राविण्य मिळवले या यशाबद्दल वरील यशस्वी विद्यार्थ्यांचा स्कूलमध्ये सत्कार कार्यक्रम घेण्यात आला.

संस्थेचे संस्थापक मार्गदर्शक व सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना ५००१, ३००१, १००१ असे बक्षीस बाबाराजे देशमुख यांनी जाहिर केले. यावेळी नातेपुते एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी महेश शेटे, ॲड. नामदेव लोंढे, प्राचार्य संदिप पानसरे, स्कूल मॅनेजर शकूर पटेल तसेच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी बोलत असताना बाबाराजे देशमुख म्हणाले की, नातेपुते येथे चांगल्या दर्जाचे शिक्षण देणारे इंग्लिश मीडियम असावं असा मानस समाजभुषण नानासाहेब देशमुख यांचा होता.

स्कूलचे संचालक मंडळ शाळेला मूलभूत सुविधा देण्याच्या दृष्टीने कायम प्रयत्नशील आहेत. संस्थेचे संस्थापक मार्गदर्शक व सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख यांनी सत्कार समारंभ प्रसंगी बोलत असताना व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य संदिप पानसरे यांनी केले असून सुत्रसंचालन हरिदास गोरवे यांनी केले व आभार सारीका पालवे यांनी मानले.

## शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

सुराज्य/सोलापूर

रिद्रय रेषेखालील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे यासाठी सरोजिनी दामोदरन फाऊंडेशन मार्फत महाराष्ट्र शिष्यवृत्ती कार्यक्रम २०२३ अंतर्गत इयत्ता ११ वीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. यासाठी फाऊंडेशनने राज्यभरातील दोन लाखांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या दारीद्रय रेषेखालील विद्यार्थ्यांना सन २०२३ महाराष्ट्र, स्टेट बोर्डात इयत्ता १० वी मध्ये ८५ टक्के हून अधिक गुण असेल असे विद्यार्थी या शिष्यवृतीसाठी पात्र ठरणार आहेत.जे विद्यार्थी वरील अटी पूर्ण करतील त्यांनी www.vidyadhan.org या संकेतस्थळाला भेट देऊन ३१ ऑगस्ट २०२३ पर्यंत अर्ज करावेत.अधिक माहितीसाठी vidyadhan. maharashtrasdfoundationindia. com वर अथवा ९६६३५१७१३१ या मोबाईलवर संपर्क साधण्याचे आवाहन सरोजिनी दामोदरन फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.



## शिवाजी काशिद बलिदानदिनानिमित्त समाधी पूजन

सुराज्य/अकलूज

सिद्धी जोहरने पन्हाळगडाला वेढा घातल्यानंतर शिवाजीराजे बनुन सिद्धीच्या छावणीत जाणारे प्रतिशिवाजी नरवीर शिवा काशिद,बाजीप्रभू देशपांडे,फुलाजीप्रभू देशपांडे, शंभूसिंह जाधव, बांदल सेनेच्या मावळ वीरांचे पराक्रम व बलिदानदिनानिमित्त स्मरण करण्यात आले.सदर मोहिमेचे संयोजन क्रांतीमित्र सामाजिक संस्थेचे अध्यक्ष किरण भांगे यांनी केले होते.

राष्ट्रीय नाभिक युवक संघटनेचे अध्यक्ष तुकाराम चव्हाण,जितेंद्र भोसले यांनी आणलेले पंढरपूर येथील पावन चंद्रभागेचे पात्रातील पाण्याने नेबापुर येथील देह समाधीला जलाभिषेक करून पूजा करण्यात आली.यावेळी शिवाजी काशिद यांचे वंशज आनंदराव काशिद,राष्ट्रीय नाभिक युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सुधीरभाऊ गाडेकर,राहुल सराटे, रवी राऊत,नामदेव वाघमारे,धनेश डांगे,विठ्ठल जाधव,अजिनाथ वाघमारे,संजय गोरे,सोमनाथ सपताळ,बबलू काशिद,चांगदेव साळुंखे,हर्षवर्धन खंडागळे,शिवाजी भांगे,रामेश्वर गवळी,दीपक राऊत,अतुल माने इ.सह कोल्हापूर,माळशिरस,पंढरपूर,धाराशिव,पुणे महाराष्ट्रातून समाजबांधव उपस्थित होते.

# दिंडूर येथील श्री धानलिंगेश्वर महाराज पुण्य स्मरणोत्सवानिमित्त कार्यक्रम

सुराज्य/अक्कलकोट

**दक्षिण सोलापूर तालुक्यातील श्री क्षेत्र दिंडूर येथील श्री धानलिंगेश्वर महाराज यांच्या बुधवार, दि. २६ जुलै रोजी एकविसाव्या पुण्य स्मरणोत्सव समारंभ संपन्न होत आहे. त्यानिमित्त १५ ते २५ जुलैपर्यंत पहाटे ५ वाजता सदगुरु धानलिंगेश्वर महाराज पालखी समवेत नामस्मरण फेरीने विविध धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक असे कार्यक्रम सुरु असल्याची माहिती श्री गुरु धानलिंगेश्वर सार्वजनिक विश्वस्त मंडळाने दिली.**

१५ ते २५ जुलै पर्यंत पहाटे ५ वाजता सदगुरु धानलिंगेश्वर महाराज यांचा नामस्मरण फेरी गावातील प्रमुख मार्गाने सुरु आहे. शनिवार दि १५ जुलै रोजी रात्री ८ वाजता श्री धानलिंगेश्वर महाराज यांची प्रतिमा पूजन व श्री संत शशिनाळ शरीफ शिवयोगी महा पुराणाचे उदघाटन श्री वेदमूर्ती बसवराज शास्त्री( सोमेश्वर मठ, तीर्थ) यांच्या हस्ते करण्यात आले.पुराणकर वेदमूर्ती शिवकवी हिरेमठ (जोगूर,कलबुर्गी) यांच्या अमृतवाणीने पुराण सुरु असून, हे पुराण २४ जुलै पर्यन्त रोजी रात्री ८ ते १० पर्यन्त चालणार आहे.शुक्रवार दि.२१ते शनिवार दि. २२ जुलै पर्यन्त लाल बहादूर शास्त्री प्रशाला व जिल्हा परिषद मराठी शाळा, दिंडूर येथील शिक्षक वृंद आयोजित विविध क्रीडा व रांगोळी स्पर्धा शुक्रवारी दुपारी ३ ते ५ व शनिवारी सकाळी सकाळी ९ ते ११ पर्यंत संपन्न होणार आहे.

रविवार दि २३ जुलै रोजी सकाळी ९ वाजता कुंभारी येथील अश्विनी रुरल मेडिकल कॉलेज हॉस्पीटल अँन्ड रिसर्च सेंटर ब्लड बँक यांच्या सौजन्याने रक्तदान शिबीर व आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. याचे उदघाटन सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीशैल नरोळे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी शेगावचे विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन सुरेश गड्डी, दिंडूरचे विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे नूतन चेअरमन, युवा उद्योजक मल्लिकार्जुन हुळळे व सोलापूर येथील गुरु गणेश इंन्टरप्राईजेसचे मालक शाम जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. मंगळवार दि २५ जुलै २०२३ रोजी श्री धानलिंगेश्वर महाराज मठ सोलापूर ते दिंडूर पर्यंत भजन मंडळ समवेत पायी चालत पालखी दिंडूर येथे सायंकाळी ५ वाजता सुलेरजवळगे, रामनहळळी, वागदरी, केगाव, कुमठे, तडवळ, शेगाव, सोलापूर येथील श्री धानलिंगेश्वर महाराज मठातील भजन मंडळ चे दिंडूर येथे आगमन व त्याच दिवशी रात्री ९ ते पहाटे ६ पर्यन्त जागरण कार्यक्रम साठी श्री सोमेश्वर ढोळळीन गायन संघ, मुरगानूर ( ता, यड्रामी जि.कलबुर्गी) येथील मुख्य गायक,चंदरु मास्तर व सहकारी त्यांचे संघ आणि बागोडी सिद्धेश्वर ढोळळीनगायन संघ.अफजलपूर याचे मुख्य गायक पुंडलिक पुजारी व त्यांचे सहकारी यांच्यात ढोळळीन गायन कार्यक्रम रंगीतदार ठरणार आहे.बुधवार दि २६ रोजी पहाटे ५ वाजता ग्रामदैवत श्री नागनाथ महाराज लिंगास व श्री गुरु धानलिंगेश्वर महाराज यांच्या मुर्तीस रुद्राभिषेक व सकाळी ९ वाजता श्री श्री श्री धानलिंगेश्वर महाराज समाधीस महामंगलारती व नंतरन सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत धानलिंगेश्वर महाराजांचे पालखी मिरवणूक गावातील प्रमुख मार्गाने होईल. त्याच दिवशी सकाळी ११ वाजता श्री धानलिंगेश्वर महाराजांचे प्रतिमा पूजन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते तर दिपप्रज्वलन एम के फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे यांच्या हस्ते होणार आहे.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सत्कारमूर्ती स्वामी समर्थ साखर कारखान्याचे चेअरमन संजीवकुमार पाटील, युवा उद्योजक महेश बिराजदार, कांचन फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सुदीप चाकोते, वळसंग पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक अनिल सनगल्ले आदींच्या प्रमुख उपस्थितीत व विशेष करून काला हा कार्यक्रम खासदार डॉ. जयसिध्देश्वर महास्वामी यांच्या अध्यक्षतेखाली तर चिणमगेरा महांतेश्वर मठाचे सिद्धाराम शिवाचार्य स्वामी यांच्या हस्ते काला कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री धानलिंगेश्वर सार्वजनिक विश्वस्त मंडळ ,नागनाथ हरिभजन मंडळ,दिंडूर व समस्त दिंडूर करांनी परिश्रम घेत आहे.



# ‘दक्षिण’चे रस्ते झाल्याने आर्थिक प्रगती : आ. देशमुख

सुराज्य/दक्षिण सोलापूर

**देशातील व राज्यातील रस्ते दळणवळणासाठी चांगले झाल्याने देशाची आर्थिक प्रगती झाली आहे. तसेच दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुख्य रस्ते चांगले झाल्याने सामान्य पासून ते शेतकऱ्यापर्यंत सर्वांना याचा फायदा झाला आहे. यामुळे तालुक्यातील रस्ते मजबूत व उच्च दर्जाचे झाल्याने तालुक्याची आर्थिक स्थिती सुधारत आहे, असे प्रतिपादन आ. सुभाष देशमुख यांनी केले.**

## शालेय विद्यार्थिनीच्या हस्ते रस्त्याचे भूमिपूजन



चिंचपूर ते भरूर रस्त्याचे भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी आ. देशमुख बोलत होते. या रस्त्याचे भूमिपूजन आ. देशमुख यांच्या सांगण्यावरून शाळेतील विद्यार्थिनींच्या हस्ते करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमाला सरपंच संगण्णा हत्तरसंग नियोजन समितीचे सदस्य डॉ. चनगोंडा हवीनाळे,डेप्युटी इंजिनिअर शैलेश गुंड, शाखा अभियंता पी. बी. जवळकोट, भाजप महिला तालुका अध्यक्ष दिपाली व्हनमाने, हनुमंत कुलकर्णी, आप्पासाहेब मोटे, अण्णाराव पाटील, संगप्पा करके, गौरीशंकर मेडगुले, सुरेश बगले, सतीश टाकळी, संगमेश बगले, मांतेश बिराजदार आदी उपस्थित होते.

यापुढे बोलताना सुभाष देशमुख म्हणाले की, दक्षिण सोलापूर तालुका अशिक्षित ठेवण्याचे पाप हे राजकिय नेत्यांनी जाणून-बुजून केले आहे. रस्त्यासाठी अनेक मुली उच्चशिक्षित शिक्षणापासून वंचित राहिले आहेत. अनेक रुग्णांना खराब रस्त्यामुळे मधीच जीव गमवावा लागला आहे परंतु आत्ताची परिस्थिती वेगळी आहे.

यावेळी डॉ. हवीनाळे बोलताना म्हणाले की, दक्षिण सोलापूर तालुक्यातील रस्ते झाल्याने तालुका सुजलाम-सुफलाम झाला आहे. जर सर्व सामान्य जनतेला विकास कामे हवी असल्यास येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदीच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहा.

यावेळी या कार्यक्रमाला यशवंत पाटील, शरणाप्पा पाटील, कुमार कोणदे, भीमाशंकर चडचण, शिवपुत्र चडचण, अशोक चडचण, श्रीमंत कोणदे, लक्ष्मण म्हेत्रे, शिवराया कोणदे, सिद्धाराम कोणदे, आमसिद्ध हत्तरसंघ, रजाक कडपे, वीरपाक्ष कोणदे, गुरुनाथ चडचण,आमसिद्ध पाटील, दयानंद साबळे, मल्लिकार्जुन साबळे, शिवानंद चौगुले, उमेश पाटील, काशिनाथ म्हेत्रे आदीसह गावातील शाळकरी विद्यार्थ्यांनी गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बेलाटीच्या बाळूमामा मंदिरात कार्यक्रम

सुराज्य/सोलापूर

उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी येथील सद्गुरू संत बाळूमामा मंदिर येथे सोमवती दर्श अमावास्यानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजनक करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीराम पाटील-बेलाटीकर यांनी दिली आहे.



विजयपूर-पुणे य राष्ट्रीय मार्गावरील प्रतिआदमापूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बेलाटी येथील संत बाळूमामा मंदिरात रविवारी सायंकाळी अमावास्या येत असल्याने दोन दिवस विविध कार्यक्रम होणार आहेत. सोमवती दर्श अमावास्यानिमित्त रविवार, १६ जुलै रोजी दिवसभर भजन, कीर्तन व सायंकाळी धनगरी ओव्यांचा कार्यक्रम होणार आहे. तसेच सोमवार, १% जुलै रोजी पहाटे बाळूमामांच्या मूर्तीस बिल्वार्चन, काकडाआरती, महापूजा, दीपपूजन व येथील मेंढ्यापूजन करण्यात येणार आहे. रविवारी व सोमवारी दिवसभर येथील अन्नछत्र येथे महाप्रसादाची सोय करण्यात आली आहे. भाविकांसाठी येथील स्टॉलमध्ये घोंगडी, ग्रंथ, विविध पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली. कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन मंदिर समितीचे अध्यक्ष पाटील-बेलाटीकर यांनी केले.



## विस्तार अधिकारीपदी नियुक्तीबद्दल हांडे यांचा सत्कार

**कुर्डूवाडी** : बारलोणी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापिका शोभा हांडे यांची शिक्षण विस्तार अधिकारी पदी पदोन्नती झाल्याबद्दल माढा तालुका मराठा सेवा संघाच्या वतीने त्यांचा जिजाऊंची प्रतिमा, पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना शोभा हांडे म्हणाल्या की, आतापर्यंत शिक्षक, मुख्याध्यापक म्हणून शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे, आता शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून काम करतानाही शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करण्याचा प्रयत्न करणार आहे. यावेळी मराठा सेवा संघाचे माढा तालुकाध्यक्ष निलेश देशमुख, उपाध्यक्ष अरूण जगताप, दत्तात्रय गरदडे, कार्याध्यक्ष शिवाजी गवळी, कोषाध्यक्ष शंकर गवळी, कुर्डूवाडी शहराध्यक्ष सचिन महिंगडे,शिक्षक नेते कैलास काशीद, महादेव चव्हाण, शिवाजी शिंदे,दत्तात्रय केंगार, मुनीर आत्तार, भाऊराव बोरसे, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख पांडुरंग हांडे उपस्थित होते.



## सनराइज् इंग्लिश स्कूलमध्ये इन्वेस्टीचर सेरेमनी

**टेंभुर्णी** : येथील सनराइज् इंग्लिश मीडियम स्कूल टेंभुर्णी येथे विद्यार्थी पदग्रहण सोहळा उत्साहात पार पाडण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष योगेश कृष्णांत बोबडे व संस्थेच्या संचालिका सुरजाताई बोबडे उपस्थित होत्या. संस्थेच्या अकॅडमिक मार्गदर्शक शाहिदा पठाण मॅडम यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रशालेचे प्रिन्सिपल गणेश पालवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमांमध्ये प्रशालेचा हेडबॉय आणि हेड गर्ल यांची ही निवड करण्यात आली यामध्ये हेड गर्ल म्हणून कुमार शिवम यादव व जान्हवी यादव यांची निवड करण्यात आली. सूत्रसंचालन विद्यार्थिनी राजनंदिनी ढवळे तसेच संस्कृती साळुंखे यांनी केले .तर आभार प्रदर्शन कुमारी संस्कृती ढवळे हिंने केले.



## एक कुटुंब एक वृक्ष योजनेचा कोंडीत शुभारंभ

**उ. सोलापूर** : तालुक्यातील कोंडी ग्रामपंचायत आवारात एक कुटुंब एक वृक्ष योजनेत उत्तरचे गटविकास अधिकारी महेश पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी समाधान नागणे, सहाय्यक प्रशासन अधिकारी आर.बी. वारगड, विस्तार अधिकारी (पं) सोमनाथ शिंदे, विस्तार अधिकारी (कृषि) एस.आर.राठोड, शाखा अभियंता जयवंत जाधव, घरकूल विभाग रिठा सुरवसे, कोंडी चे सरपंच सुरेश राठोड, उपसरपंच आबा, ग्रामसेवक मारुती कांबळे, ग्रामसेवक संघटना अध्यक्ष गंगाधर कांबळे,प्रतापसिंह भोई,राजेंद्र साबळे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.



## मंगरूळे प्रशालेस कमांडिंग ऑफिसरची भेट

**अक्कलकोट** : येथील के एल ई संचलित मंगरुळे प्रशालेस ९ महाराष्ट्र एनसीसी बटालियन सोलापूर येथील कमांडिंग ऑफिसर कर्नल राजा माजी व इतर ऑफिसरने सदिच्छा भेट दिली सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. एनसीसी कॅडेट्सना मार्गदर्शन करताना कर्नल राजा माजी यांनी एक उत्तम नागरिक, शिस्त,यश मिळवण्यासाठी प्रयत्न करावे असे सांगितले. त्याचप्रमाणे प्रशालेचे मुख्याध्यापक श्री नंदाजी कदम यांनी त्यांचे स्वागत करून एनसीसी कॅडेट्सना शिस्त, शांतता व स्वच्छता या शाळेच्या त्रिसूत्रीचे वर्णन केले. कार्यक्रमास प्रशालेतील एकूण २५ एनसीसी कॅडेट्स हजर होते.त्यांच्यासोबत सुभेदार मेजर गनबहादुर गुरूंग, नायब सुभेदार बंडू गळवे, हवालदार मच्छिंद्र शेंद्रे हजर होते. सूत्रसंचालन एनसीसी ऑफिसर सचिन डफळे यांनी केले.

## पूर्व वैमानस्यातुन दोन गटात तूफान हाणामारी

**सोलापूर** : पूर्व वैमानस्यातुन दोन गटात मौलाली चौक परिसरात तुफान हणामारी झाली.यात दोन्ही गटातील सोळा जणांवर सदर बाझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत दोन्ही गटाने परस्पर विरोधी फिर्याद दिली आहे.यात पहिल्या गटातील ईस्तीयाक हबीब शेख (वय-३५,रा. शास्त्री नगर,मिलत मोहल्ला) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार आरोपींनी येऊन शिवीगाळ करत मारहाण केली. याप्रकरणी उमर ऊर्फ फिरोज मशाक शेख, जुबेर बसरी, जब्बार बशरी, वसीम मोहोळकर, एजाज दंन्डो व इतर दोन जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. तसेच दुसर्या गटातील उमर मशाक शेख यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार इस्तीयाक हबीब शेख, बब्बु ईस्माईल शेख, सलमान हबीब शेख, इमाद मुन्ना शेख, मुन्ना शेख, इस्तियाक रंगरेज व इतर तीन जणांनी मिळून फिर्यादीला मारहाण केली.

# प्रांत कार्यालयात विद्यार्थ्यांचे दाखले अडवणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करा

सुराज्य/लक्ष्मीदहिवडी

शाळांचे प्रवेश,ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी लागणारे दाखले काढण्यासाठी विद्यार्थी व पालकांची धावपळ सुरू असते.मंगळवेढा तालुक्यामध्ये सध्या जातीचे दाखले, नॉन क्रिमिनल दाखले हे प्रांत कार्यालयातून वेळीच सोडण्यास टाळाटाळ होत असल्याच्या तक्रारी आहेत. याअडचणी सोडवा, संबंधितांवर कारवाई करा, अशा सूचना आ. समाधान आवताडे यांनी प्रांत अधिकारी आप्पासाहेब समिंदर यांना दिल्या.

सध्या अनेकजण नोकरीसाठी,शाळेच्या प्रवेशासाठी कागदपत्रांची जुळवाजुळव करत आहेत त्यातच वेळेवर दाखल्यासाठी मोठ्या प्रमाणावर धावपळ सुरू असते नोकरीसाठी ऑनलाईन अर्ज भरत असताना विविध दाखल्यांची गरज लागते.

यामध्ये प्रांत कार्यालयाकडून प्रांत अधिकारी यांच्या ऑनलाइन प्रणालीच्या सहीद्वारे नॉन क्रिमीलेअर, जातीचा दाखला सोडला जातो प्रांत अधिकाऱ्याने ऑनलाईन दाखले सोडण्यासाठी कार्यालयातीलच एका कर्मचाऱ्याला (डीएससी)वापरायचे अधिकार दिलेले आहेत.

मात्र तो दाखले वेळेत सोडत नसून लोकांचे दाखले वेळेत सोडत असल्याचे चर्चिले जात असून टोकन घेऊन प्रांत ऑफिसमध्ये न जाणाऱ्या नागरिकांचे दाखले प्रलंबित ठेवले जात असल्याच्या चर्चा आहेत.

केवळ चिरी-मिरी मिळवण्याच्या उद्देशाने दाखले प्रलंबित ठेवले जात असल्याचे आरोप विद्यार्थी व पालकांकडून होत असून आमदार अवताडे यांच्याकडे ही तक्रार गेल्यानंतर त्यांनी संबंधित कर्मचाऱ्यावर कारवाई करून दाखले तात्काळ सोडण्याच्या सूचना दिल्या आहेत.

### महा ईसेवा सेंटर चालकांकडूल लूट

मंगळवेढा शहरात बोटावर मोजण्याइतक्याच महा इसेवा सेंटरची परवानगी आहे मात्र ग्रामीण भागातील महा इ सेवा सेंटरची मंजुरी असताना शहरात येऊन सेंटर उघडून अनेकांनी अवैध पद्धतीने दुकानदारी थाटली आहे. दाखल्याचा शासकीय दर ३३ रुपये ८० पैसे असताना ३०० ते ५०० रुपये घेऊन नागरिकांची अक्षरशः लूट सुरू आहे. अशा अवैध महा इ सेंटर चालकांवर नूतन तहसीलदार मदन जाधव यांनी नियंत्रण आणून ही लूट थांबवावी, अशी मागणी नागरिकातून होत आहे.



**आमदार आवताडे यांच्या प्रांत अधिकाऱ्यांना सूचना**

## भांडणाबाबत विचारपूस करताना मारहाण

**सोलापूर** : झालेल्या भांडणाबाबत विचारपूस करत असताना मारहाण केल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बहादुरसिंग रजपूत, सुधीरसिंग रजपूत, प्रकाशसिंग काटेवाले, आकाश बाळू कांबळे, शांताबाई रजपूत (रा.दहिटणे) असे गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.याप्रकरणी महादेवी राजेश बिराजदार (वय-४२,रा.कण्णी प्लॉट,समर्थ नगर,दहिटणे) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. १३ जुलै रोजी फिर्यादी यांचे दीर दऱ्याप्पा बिराजदार हे भाचीचा नवरा सुधीर सिंग रजपूत यांच्या घरासमोर जाऊन १२ जुलै रोजी झालेल्या भांडणाबाबत विचारपूस करत असताना वरील लोकांनी मारहाण केली. पुढील तपास स.पो.नि. जाधव हे करीत आहेत.

# मोहोळ तालुक्यात ड्रोन सदृश्य वस्तू दिसल्याने नागरिकांमध्ये घबराट

सुराज्य/मोहोळ

तालुक्यातील काही भागात रात्री आठ ते अकरा वाजेपर्यंत ड्रोन सदृश्य वस्तू आकाशातून फिरत असल्याने नागरिकात घबराहट पसरली आहे. दरम्यान ते ड्रोन नसून लहान विमाने असल्याचा निर्वाळा बारामती येथील वैमानिक प्रशिक्षण केंद्राचे अधिकारी शक्ती सिंग यांनी दिला.



या संदर्भात अधिक माहिती अशी की, गेल्या आठवड्या भरापासून आकाशात ड्रोन सदृश्य वस्तू फिरताना पापरी ता मोहोळ येथील काही शेतात राहणाऱ्या शेतकऱ्यांनी तसेच गावातील ग्रामस्थांनी पाहिले. घरापासून सुमारे ६० ते ७० फूट उंचीवरून ते फिरत असून लेझर लाईट’ प्रमाणे त्याचा उजेड पडतो आहे. त्यामुळे ग्रामस्थ व शेतकरी यांच्यात भीतीचे वातावरण पसरले आहे. अनेक नागरिकांनी या संदर्भात मोहोळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधून ही माहिती कळविली. दरम्यान या संदर्भात अधिक माहिती घेतली असता बारामती जिल्हा पुणे येथे दोन वैमानिक प्रशिक्षण केंद्र आहेत. त्या केंद्राच्या माध्यमातून नवीन वैमानिकांना विमान चालविण्याचे प्रशिक्षण दिले जाते व त्यांच्या कडून सराव करून घेण्यात येतो. हे प्रशिक्षण रात्री दिले जाते.

ज्या भागात सरावासाठी जायचे आहे तेथील प्रशासनाची परवानगी घेतली जाते. हे ड्रोन नसून लहान विमाने असल्याचे प्रशिक्षण केंद्राचे प्रशिक्षक शक्ती सिंग यांनी सांगितले. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये असे आवाहन मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी केले.

## चोरट्याने रकमेसह मोबाईल पळवला

सुराज्य/सोलापूर

अज्ञात चोरट्याने घराच्या उघड्या दरवाजातून हॉलमध्ये प्रवेश करत फिर्यादी सोमनाथ नीलकंठ कांबळे (वय-४३,रा. संगमेश्वर नगर) यांच्या पॅन्टच्या पाठीमागील खिशातील रोख रक्कम व मोबाईल असा एकूण १९ हजारांचा ऐवज चोरून नेला आहे.ही घटना संगमेश्वर नगर येथे घडली.याप्रकरणी सोमनाथ कांबळे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल गायकवाड हे करीत आहेत.



## अन्नछत्र मंडळातर्फे जोल्ले यांचा सत्कार

सुराज्य/अक्कलकोट

कर्नाटक राज्याचे माजी मंत्री शशिकला जोल्ले यांनी स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाला सदिच्छा भेट दिली.

न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांचा मंडळाच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

त्यांच्या समवेत चिक्कोडीचे खासदार अण्णासाहेब जोल्ले हे उपस्थित होते. यावेळी मंडळाचे सचिव शामराव मोरे, सिद्धाराम कल्याणी, एस.के.स्वामी, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, बाळासाहेब पोळ, दत्ता माने, सुनील नंदिकोले, निखिल पाटील, सौरभ मोरे, वैभव मोरे, विशाल कलबुर्गी, सचिन कलबुर्गी, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे आदी उपस्थित होते.

## वाघ हल्लाप्रकरण; अहवाल देण्याचे आदेश

सुराज्य/बार्शी

येथील मुकेश किसन वाघ यांच्यावर दि २४ जून २०१९ रोजी प्राणघातक हल्ला झाला होता. या गुन्ह्याचा पुढील तपास करून त्याबाबतचा अहवाल एक महिन्याच्या आत न्यायालयात सादर करण्याचे आदेश न्या. एस.बी.विजयकर यांनी बार्शी शहर पोलिसांना दिले.

मुकेश किसन वाघ यांच्यावर झाल्यानंतर अनिल दत्तात्रय शेळवणे, वसीम शौकत शेख , विशाल उर्फ बच्चन सातपुते (सर्व रा बार्शी) व एक अनोळखी व्यक्ती यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला होता. याप्रकरणी मुकेश वाघ यांच्या वतीने ॲड. आकाश तावडे यांनी बाजू मांडताना तपासी अधिकारी यांनी राजकिय दबावात येऊन तपास केला तसेच आरोपींनी स्वतः गुन्ह्यात दोन पेक्षा अधिक आरोपींचा सहभाग असल्याचे कबूल केले आहे. गुन्ह्यातील घटनास्थळ पंचनाम्यात चार आरोपींचा सहभाग असल्याचे नमूद आहे, तपास अधिकाऱ्याने आरोपी विशाल सातपुते हा घटनास्थळावर नव्हता. याबाबत सी.सी.टी.वी फुटेज जप्त केले व पण फुटेज असलेला पेन ड्राईव्ह न्यायालयात दाखल केलेला नाही. या सर्व बाबी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एस.बी.विजयकर यांनी उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकून तपास अधिकारी गायकवाड व येडगे यांनी दोन आरोपींना वगळण्याचा पुढील तपास करण्याचे आदेश पारित केला आहे. याप्रकरणी फिर्यादीच्यावतीने ॲड. आकाश तावडे व ड सुहास कांबळे यांनी काम पाहिले.

# भैरवनाथ शुगरच्या मिल रोलरचे पूजन

सुराज्य/माढा

माढा तालुक्यातील आलेगाव बुद्रुक येथील भैरवनाथ शुगर वर्क्स लि. युनिट नंबर ४ या साखर कारखान्यांमध्ये सन २०२३-२४ च्या गळीत हंगामासाठी मिल रोलरचे पूजन चेअरमन प्रा शिवाजीराव सावंत यांच्या हस्ते करण्यात आले



भैरवनाथ शुगरचे संस्थापक तथा महाराष्ट्र राज्याचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रा. डॉ तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना प्रगतीपथाकडे वाटचाल करीत आहे. सन २०२३-२४ च्या गळीत हंगामासाठी ऊस तोडणी व वाहतूक करार पूर्ण झाले असून मागील वर्षाचे सर्व ऊस बिल ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अदा केले आहे.यावेळी कार्यक्रमास कार्यकारी संचालक पृथ्वीराज सावंत, जनरल मॅनेजर सुरेश पाटील, पंढरीनाथ चंदनकर, तानाजी गाडे, भजनदास खटके, संतोष ढवळे, अरविंद खरात, अशोक निकम, प्रोसेस जनरल मॅनेजर पोपट क्षीरसागर, चिफ अकौंटंट विठ्ठल काळे, असिस्टंट जनरल मॅनेजर आबासाहेब वाघ, सिव्हिल विभाग प्रमुख राहुल खटके, स्टोअर कीपर सुधीर पाटील, ईडीपी मॅनेजर प्रवीण बर्गे, हेड टाईम किपर सुमित साळुंखे उपस्थित होते.

# संत नामदेव महाराजांनी बंधुत्वाची शिकवण दिली : धैर्यशील

सुराज्य/अकलूज

मोगल काळात भागवत धर्माचा प्रचार व प्रसार करुन वारकरी सांप्रदाया बरोबरच सकल मानव जातीला शांती , समता व बंधूताची शिकवण देणारे संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांचे कार्य समस्त मानव जातीसाठी प्रेरणादायी असून वर्षभरात त्यांचे सुंदर व भव्यदिव्य मंदिर उभा करु अशी ग्वाही भाजपचे नेते धैर्यशील मोहिते पाटील यांनी दिली .



संत शिरोमणी श्री नामदेव महाराज ट्रस्टच्या वतीने संत नामदेव महाराज यांच्या ६७३ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त अकलूज येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . पंढरपूरचे संत साहित्याचे अभ्यासक प्र . द . निकते यांचे प्रवचन व मोहिते पाटील यांच्या हस्ते संत नामदेव महाराजांची पूजा व आरती करण्यात आली . यावेळी पंढरपूर ते घुमान या २५०० किलोमीटर सायकल यात्रेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल भागवत धर्म प्रसारक समितीचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे व समाजातील विविध क्षेत्रात यश संपादन केलेल्या गुणवंतांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमास माजी सरपंच किशोरसिंह माने पाटील , पंचायत समिती सदस्या हेमलता चांडोले , डॉ राहूल जवंजाळ , महिला अध्यक्षा वैशाली पोरे , अध्यक्ष कल्याण मुळे , उपाध्यक्ष राजू ढेरे , नाना जवंजाळ , दादा मुळे , वैभव जामदार , गजानन जवंजाळ , गणेश जामदार , सुधीर मुळे , महेश जामदार , संजय फुटाणे यांच्यासह असंख्य भाविक व समाज बांधव उपस्थित होते .

## सरकारी कामात अडथळा; एकाची निर्दोष मुक्तता

सुराज्य/बार्शी

येथील वाहतूक पोलिसांच्या कामात अडथळा करत खंडणी मागितली या प्रकरणी सबळ पुराव्या अभावी बार्शी येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश एल. एस. चव्हाण यांनी सुहास कांबळे यांची सदर आरोपातून निर्दोष मुक्त केली.

बार्शी येथे दि २ एप्रिल २०१७ रोजी फिर्यादी विलास राठोड पोस्ट चौक येथे वाहतूक केसेस करीत असताना सुहास कांबळे मोटार सायकलवरून तेथे आला. त्यांनी मी पत्रकार आहे. तुम्ही मला महिन्याला तीन हजार रुपये हप्ता दया, नाहीतर मी तुमचे फोटो काढून तुमच्या एस.पी.(पोलीस अधीक्षक) ला पाठवतो व पेपरला देतो असे म्हणाला.

पैसे न दिल्याने अंगावर धावून आला आणि धमकी देत सरकारी कामात अडथळा आणल्याची फिर्याद दिली होती. आरोपी विरुद्ध सबळ पुरावा नसल्याने जिल्हा व सत्र न्यायाधीश एल एस चव्हाण यांनी सुहास कांबळे यांची सदरच्या गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता केली. यात आरोपीच्या वतीने ॲड. प्रशांत एडके,ॲड. समाधान सुरवसे यांनी काम पाहिले.

# मराठी चित्रपट सृष्टीतील विनोद खन्ना अशी ओळख असणारे
# रविंद्र महाजनी काळाच्या पडद्याआड

## पुण्यातील घरात आढळला मृतदेह

सुराज्य/पुणे

**मराठीतील विनोद खन्ना अशी ओळख असणारे प्रतिभावंत अभिनेते रविंद्र महाजनी यांचा मृत्यू झाला आहे. ७७ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. पुण्यातील तळेगाव-दाभाडे येथील त्यांच्या राहत्या घरात त्यांचा मृतदेह आढळून आला. रविंद्र महाजनी हे गेल्या काही दिवसांपासून तळेगाव दाभाडे येथे राहत होते. रविंद्र महाजनी यांच्या जाण्यानं मराठी चित्रपट सृष्टीतून हळहळ व्यक्त होत आहे.**

शुक्रवारी शेजाऱ्यांनी रविंद्र महाजनी राहत असलेल्या घरातून दुर्गंधी येत असल्याची माहिती तळेगाव पोलिसांना दिली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत, रविंद्र महाजनी राहत असलेल्या घराचा दरवाजा तोडला. त्यावेळी पोलिसांना रविंद्र महाजनी यांच्या मृतदेह आढळून आला. दरम्यान, दोन ते तीन दिवसांपूर्वीच मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलीस तपासात व्यक्त केला जात आहे.

रविंद्र महाजनी यांचा मुलगा अभिनेता गश्मीर महाजनी मुंबईत राहतो. पोलिसांनी त्याला सर्व माहिती दिली असून तो तात्काळ पुण्यात दाखल झाला. रविंद्र महाजनी यांचा मृतदेह पोलिसांनी ताब्यात घेतला असून शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला आहे. शवविच्छेदनानंतर मृतदेह त्यांचा मुलगा गश्मीर महाजनीकडे सोपवण्यात येणार आहे. शनिवारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार होतील, अशी माहिती मिळत आहे. तळेगाव ग्रामीण रुग्णालयात रविंद्र महाजनींच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार होणार आहेत. गेल्या ७ ते ८ महिन्यांपासून ते एकटेच इथं राहत होते. भाड्याने हा फ्लॅट त्यांनी घेतला होता. मात्र शुक्रवारी सायंकाळी अचानकपणे त्याच्या घरातून दुर्गंधीचा वास येऊ लागल्याने शेजाऱ्यांनी पोलिसांना याबाबत माहिती कळवली. पोलिसांनी घराचे दार तोडून प्रवेश केला तेंव्हा ते मृतावस्थेत आढळले. सर्व परिस्थिती पाहिली असता





### रवींद्र महाजनी खरंच राजामाणूस होते

माझ्यामुळे एका डायलॉगसाठी पर डे जातो म्हटल्यावर निर्माता वैतागेल माझ्यावर. महाजनी बघुया अस म्हणून दुसऱ्या दिवशी येतो म्हणून आले, त्यांनी वेळेत येवून काम केलं. निघताना निर्मात्याने काही न बोलता त्यांचं पेमेंट जे होतं ते दिलं.''त्यांनी किती आहेत म्हणून विचारलं. प्रोडक्शन मॅनेजरने सांगितलं पूर्ण दिवसाचे आहेत. त्यांनी पाकीट उघडलं त्यातील एक ५०० ची नोट काढून घेतली आणि म्हणाले हे माझं ट्रॅव्हलिंग आणि उरलेलं पाकीट परत करत पुढे म्हणाले, 'नाही रे एका डायलॉगसाठी पूर्ण दिवसाचं पेमेंट घेण्याइतका मी मोठा नाही.' खरंच प्रसिध्दीच्या शिखरावर असताना हे म्हणायला किती मोठं मन लागत आणि ही माणसं अशी होती म्हणूनच ती मोठी होती. रवींद्र महाजनी साहेब नावाप्रमाणेच महान जन होते.

२-३ दिवसांपूर्वी त्यांचा मृत्यू झाला असण्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला. महाजनी यांनी प्रामुख्याने मराठी, हिंदी आणि गुजराती चित्रपटांमध्ये अभिनय केला आहे. १९७५ मध्ये व्ही. शांताराम दिग्दर्शित झुंज या मराठी चित्रपटाद्वारे त्यांनी चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं. त्यांनी भूमिका साकारलेले लक्ष्मी (१९७८), दुनिया करी सलाम (१९७९), गोंधळात गोंधळ (१९८१), मुंबईचा फौजदार (१९८५) हे चित्रपट विशेष गाजले. रविंद्र महाजनी यांनी दिग्दर्शक आणि निर्माता म्हणूनही काम केलं आहे. त्यांनी १९९७ साली प्रदर्शित झालेल्या सत्तेसाठी काहीही या चित्रपटासाठी दिग्दर्शक म्हणून काम केलं होतं. तसेच, या चित्रपटाची निर्मितीही त्यांनीच केली होती.

### रवींद्र महाजनी पंचत्वात विलीन

रवींद्र महाजनी यांच्यावर नवी पेठे येथील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत.



रवींद्र महाजनी यांच्या अंत्यदर्शनासाठी अनेक मराठी कलाकार पोहोचले आहेत. प्रविण तरडे, मृण्मयी देशपांडे यांच्यासह अनेक कलाकारांनी त्याचं अंत्यदर्शन घेतलं. महाजनी कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला असून कधीही न संपणारं हे दु:ख आहे. रवींद्र महाजनी यांच्या निधनाची वार्ता त्यांच्या पत्नीला काही उशीरानं देण्यात आली. त्यानंतर अंत्यदर्शनासाठी त्यांना घेऊन येण्यात आलं. आईला आधर देताना गश्मीरच्या चेहऱ्यावरचं दु:खही खूप काही सांगून जात आहे.

### भाड्याचं घर, कुणाशीही बोलणं नाही

मावळ तालुक्यातील आंबी भागात असलेल्या एका इमारतीत रवींद्र भाड्यानं राहत होते. महाजनी गेल्या आठ महिन्यांपासून याठिकाणी राहत होते. मात्र, ते शेजाऱ्यांसोबत जास्त बोलत नव्हेत, आजुबाजूच्या लोकांशी फार संपर्क नव्हता. दोन दिवसांपासून त्यांनी दरवाजा उघडला नाही, त्यांच्या घरातून दुर्गंधी येत असल्यानं बिल्डिंगमधली शेजाऱ्यांनी पोलिसांना कळवलं. यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत घराचा दरवाजा तोडला. त्यानंतर रवींद्र महाजनी यांचा मृतहेद आढळला. त्यांचा मृतहेद शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून तो कुटुंबियांच्या ताब्यात येण्यात येईल, असंही पोलिसांनी सांगितलं आहे. रवींद्र महाजनी ज्या बिल्डिंगमध्ये राहत होते. आदिका वारंगे या तिथं सफाई कर्मचारी म्हणून काम करतात

### कशामुळे झाला असावा महाजनींचा मृत्यू?

ते गेल्या आठ महिन्यांपासून इथे राहत होते. मध्ये काही काळ आजारीही होते. घरात कोणत्याही प्रकारच्या जबरदस्तीच्या कुठल्याच खुणा नव्हत्या. पोलीस पोहोचले तेव्हा महाजनी जमिनीवर पडलेले होते. आंघोळीनंतर कपडे बदलत असताना तोल जाऊन ते पडले असावेत, असा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. अंघोळीनंतर ते पाय घसरुन पडले असावेत आणि दोन-तीन दिवसांपूर्वी त्यांचा मृत्यू झाला असावा, असा कयास त्यांच्या मृतदेहावरुन लावला जात आहे. पोस्टमार्टम रिपोर्टनंतर त्यांच्या मृत्यूचं नेमकं कारण स्पष्ट होणार

---

## ▶▶ महत्त्वाचे वृत्त...

### २५ लाखाची लाच; पोलीस निरीक्षक अटकेत

**मुंबई** : गुन्हा दाखल असलेल्या एका आरोपीला मदत करण्यासाठी त्याच्याकडे २५ लाख रुपयांची लाच मागणाऱ्या पोलीस निरीक्षकासह एका पोलीस शिपायाला लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली. भूषण दायमा (४०) आणि रमेश बतकळस (४६) अशी अटक पोलिसांची नावे असून दोघेही मुलुंड पोलीस ठाण्यात कार्यरत होते. काही दिवसांपूर्वी तक्रारदाराविरूद्ध मुलुंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक भूषण दायमा करीत होते. या गुन्ह्यात तक्रारदारांनी अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात धाव घेतली होती. मात्र न्यायाल्याने त्याचा जमीन नाकारला होता. त्यामुळे दायमा याने आरोपीला अटकेची भीती दाखवून, तसेच गुन्ह्याचे स्वरूप कमी करण्यासाठी त्याच्याकडे २५ लाख रुपयांची मागणी केली.

### पर्यावरण संवर्धनासाठी सौरऊर्जा प्रकल्पावर भर

**मुंबई** : डिझेल, कोळशावरील विजेचा वाढता वापर पर्यावरणासाठी धोकादायक असून पर्यावरणाच्या संवर्धनासाठी कमीत-कमीत इंधन आणि विजेचा वापर करण्याकडे मध्य रेल्वेचा कल आहे. विजेची गरज भागवण्यासाठी मध्य रेल्वे अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पाची उभारणी करीत आहे. मोकळ्या आणि वापरात नसलेल्या २,६९४ किमी जागेवर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहे. या प्रकल्पात निर्माण सौरऊर्जेचा वापर रेल्वे परिसरातील विजेचे दिवे, पंखे व इतर लहान उपकरणासाठी करण्यात येणार आहे. मध्य रेल्वेने २०३० पूर्वी 'निव्वळ शून्य कार्बन उत्सर्जक' बनण्याचे ध्येय ठेवले आहे. त्यामुळे डिझेल लोको इंजिन कमी करून विद्युत लोको इंजिन वापरावर भर दिला जात आहे.

### पुण्यातील गुन्हेगारांची झाडाझडती

**पुणे** : शहरातील वाढत्या गुन्हेगारी घटनांच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी मध्यरात्री शहरातील गुन्हेगारांची पुन्हा झाडाझडती घेतली. विशेष मोहिमेत (कोम्बिंग ऑपरेशन) पोलिसांनी १८२४ गुन्हेगारांची तपासणी केली. त्यापैकी ५७७ गुन्हेगार मूळ पत्यावर वास्तव्यास असल्याचे आढळून आले. बेकायदा शस्त्र बाळगल्या प्रकरणी १३ जणांना अटक केली असून, त्यांच्याकडून दोन पिस्तूल, सात काडतुसे, १३ कोयते असा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. शहरातील गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस आयुक्त रितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी गुन्हेगारांवर कडक कारवाईचे आदेश दिले आहेत.

### विषबाधमुळे माय-लेकाचा मृत्यू

**भाईंदर** : विषबाधा झाल्याने आईसह आठ वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाला आहे तर एकाची प्रकृती गंभीर आहे. भाईंदर पश्चिमेच्या मुर्धे गावात चव्हाण कुटुंबीय राहतात. शुक्रवारी सायंकाळी साडेआठच्या सुमारास राम चव्हाण हे गावावरून आले असता त्यांना आपल्या घरातील दार बंद दिसले. त्यामुळे त्यांनी खिडकीतुन आत पहिल्यानंतर त्यांना आपला मुलगा रोहीत (८) हा जमिनीवर पडला असल्याचे दिसून आले. त्यामुळे त्यांनी दरवाजा तोडून घरात प्रवेश केला.यावेळी पत्नी कविता चव्हाण (२७) हिच्या तोंडाला फेस येऊन ती पडलेली होती. आणि भाऊ शाम चव्हाण (२७) हा देखील बाथरूम मध्ये बेशुद्ध अवस्थेत होता. त्यामुळे त्यांनी तिघांना उपचारासाठी भाईंदर पश्चिम येथील भीमसेन जोशी रुग्णालयात आणले. परंतु, मुलाचा आधीच मृत्यू झाला होता. तर आईवर उपचार सुरु असताना तिचा पहाटे मृत्यू झाला आहे. शाम चव्हाण यांची प्रकृती देखील चिंताजनक आहे.

### सतर्क तिकीट तपासनीसामुळे वाचले महिलेचे प्राण

**अंबरनाथ** : रेल्वे स्थानकावर एका तिकीट तपासनीसाच्या सतर्कतेने धावत्या लोकलला ओढल्या जाणाऱ्या महिला प्रवाशांचे प्राण वाचले आहेत. शुक्रवारी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास कर्जत लोकलच्या वेळी हा प्रकार घडला. अंबरनाथ रेल्वे स्थानकात सकाळी सात वाजून तीन मिनिटांनी कर्जतला जाणारी लोकल आली होती. या लोकलमध्ये चढताना एका वयोवृद्ध महिला प्रशाचा तोल गेला. त्यामुळे त्या पडल्या आणि फलाट आणि लोकलमध्ये अडकून घासत जात होत्या. त्याचवेळी स्थानकात उपस्थित असलेल्या तिकीट तपासनीस अबिनाश कुमार आणि शाम्यु यांनी तातडीने धाव घेत या महिलेला लोकलपासून मागे खेचत त्यांचे प्राण वाचवले.

### १५ लाखांचे ड्रग्ज जप्त; एकास अटक

**नवी मुंबई** : येथलि एपीएमसी येथे एम डी हा अंमली पदार्थ विक्री प्रकरणी एका आरोपीस अटक करण्यात आले आहे. त्याच्या कडे १५ लाख ११ हजार ७०० रुपयांचे १५१.१७ ग्रॅम वजनाचे एमडी जप्त करण्यात आले आहे. सदर कारवाई अंमली पदार्थ विरोधी पथकाने केली आहे. सेक्टर १९ वाशी येथील सतरा प्लाझा जवळ बालाजी कार डेकोर दुकान समोरील पदपथावर संशयित व्यक्ती आढळून आली. त्याला ताब्यात घेत अंगझडती केली असता त्याच्या कडे एमडी आढळून आले. आरोपीला अटक केले असून अरशद करार खान असे त्याचे नाव आहे. तांत्रिक तपास करून या प्रकरणातील अन्य आरोपींचा शोध घेत आहोत.

### प्राचार्यांचा त्रास; प्राध्यापकांचा गळफास

**नागपूर** : शहरातील जीएस महाविद्यालयाचे प्राध्यापक गजानन कराळे यांना माजी प्राचार्य आणि चार प्राध्यापकांनी मानसिक त्रास देऊन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याच्या आरोपाखाली बेलतरोडी पोलिसांनी माजी प्राचार्य एन. वाय. खंडाईत, बच्चू पांडे, भावना गड्डवार, तौसिक पठाण यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला. प्रा. कराळे यांनी आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत या चौघांची नावे होती. जीएस महाविद्यालयात प्राध्यापक असलेल्या ४२ वर्षीय गजानन कराळे यांनी ९ जुलैला गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांनी डायरीत सुसाईड नोटही लिहिली व त्यात महाविद्यालय व्यवस्थापनाच्या छळाला कंटाळून हे पाऊल उचलल्याचे सांगितले.

### अल्पवयीन मुलीचा विनयभंग; आरोपीस ५ वर्षे सक्तमजुरी

**कोल्हापूर** : अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी आरोपीस ५ वर्षे सक्तमजुरी व १० हजार रुपये दंडाची शिक्षा शुक्रवारी न्यायालयाने सुनावली. यशवंत राजाराम मेणे (वय ४६,रा. अरवली, संगमेश्वर रत्नागिरी) असे आरोपीचे नाव आहे. किसरूळ पैकी मुगडेवाडी गावामध्ये ही घटना ८ फेब्रुवारी २०१५ रोजी घडली होती. फिर्यादीच्या घराजवळ दूध डेअरी आहे. दूध नेण्यासाठी येणाऱ्या टेम्पोवर आरोपी मेने हा क्लीनर म्हणून काम करत होता. त्याचे आरोपीच्या घरी वरचेवर येणे जाणे होते. त्यादिवशी पीडित मुलगी गल्लीत खेळण्यासाठी गेली होती. ती रडत आली तेव्हा फिर्यादीने तिला जवळ घेऊन चौकशी केली. यावेळी त्याने तिचा विनयभंग केला. ही घटना पीडितेने घरी सांगितली.

---

## शरद पवार ॲक्शन मोडवर; १२ आमदारांना राष्ट्रवादीकडून कारणे दाखवा नोटीस

सुराज्य/मुंबई

अजित पवारांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर ८ आमदारांनीही त्यांच्यासोबत मंत्रीपदाची शपथ घेतली होती. शुक्रवारी अजित पवार गटाच्या ८ मंत्र्यांना खातेवाटप जाहीर करण्यात आलं आहे.

दरम्यान, खातेवाटपानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे आता ॲक्शन मोडवर आले आहेत. शरद पवार गटाच्या राष्ट्रवादीकडून १२ आमदारांना कारणे दाखवा नोटीस पाठवण्यात आली आहेत. आमदारांना उत्तर देण्यासाठी ४८ तासांचा अवधी देण्यात



आला आहे. शरद पवार यांनी ५ जुलै रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे पक्षाची बैठक बोलावली होती. या बैठकीला मंत्रिपदाची शपथ घेतलेले ९ आमदार वगळून सर्व आमदारांना निमंत्रित करण्यात आले होते. परंतु त्याच दिवशी अजित पवार यांनीही वांद्रे येथील एमआयटी येथे बैठक बोलवली होती. त्या बैठकीला राष्ट्रवादीचे काही आमदार गेले होते. मात्र, शरद पवारांनी बोलवलेल्या बैठकीत गैरहजर राहून पक्षविरोधी कारवाई केल्याप्रकरणी १२ आमदारांना नोटीस पाठवण्यात आली आहे. 'या' आमदारांना पाठवली नोटीस :सुनील शेळके, दिलीप बनकर, नितीन पवार, दीपक चव्हाण, इंद्रनील नाईक, यशवंत माने, शेखर निकम, राजू कारेमोरे, मनोहर चंद्रकपुरे, संग्राम जगताप, राजेश पाटील, माणिकराव कोकाटे या १२ आमदारांना शरद पवार गटातून नोटीस पाठवण्यात आली आहे.

## सुहास कांदे बैठकीत भडकल्याने अधिकाऱ्याला आली भोवळ

सुराज्य/नाशिक

मालेगाव तालुक्यातील माझ्या मतदारसंघातील ४८ गावांना निधी द्यायचा नाही, असे तुम्हाला कुणी सांगितले आहे का? असा थेट सवाल करीत नादंगावचे आमदार सुहास कांदे यांनी एकाचवेळी पालकमंत्र्यांसह जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यावर शरसंधान साधले.

निधी वितरणाऐवजी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अर्जुन गुंडे यांची दडपशाही, ब्लॅकमेलिंग



सुरू असून त्यांच्यावर कठोर कारवाई करा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. कांदे यांनी धारेवर धरल्याने गुंडे भोवळ येऊन पडले. त्यामुळे पालकमंत्री दादा भुसे यांनी जिल्हा नियोजन समितीची बैठक आटोपती घेतली.

## अक्कलकोट तालुक्यात...पीकविमा भरताना शेतकऱ्यांची आर्थिक लूट

### ▶ पीक विम्याचा शेतकरी हिस्सा १ रुपया; खर्च मात्र १०० ते २०० रुपये

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट शहर तालुक्यात एक रूपयाच्या पीक विम्याचा नोंदीसाठी प्रत्येक फॉर्म ला किमान ५०,१०० तर कुठे २०० रुपयांपर्यंत खर्च येत असल्याने सामान्य शेतकरी भरडला जात आहे. यंदापासून सर्वसमावेशक पीकविमा योजना राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असुन शेतकरी हिस्याचा विमा रक्कम राज्य शासन कडुन भरण्यात येणार आहे.शेतकऱ्यां कडुन फक्त एक रुपया आकारला जाणार आहे.योजना पोर्टलवर स्वतः शेतकरी अर्ज करू शकतात. तसेच बँक, विमा कंपनी प्रतिनिधी व सामुहिक सेवा केंद्र (सीएससी) यांच्यामार्फत अर्ज करू शकतात. प्रत्यक्षात शेतकऱ्यांकडून केवळ १ रुपया आकारले पाहिजे. मात्र शेतकऱ्यांची आर्थिक लूट होत असल्याची स्थिती आहे.

शेतकरी यांना सीएससी केंद्रावर जाण्याशिवाय पर्याय नाही. याचा गैरफायदा घेत किमान ५० रुपयांपासून १०० ते २०० रुपयांपर्यंत आकारणी केली जात असल्याचे अनेक शेतकरी सांगत आहेत. शेतकऱ्यांना छायांकित प्रतीसाठी १० ते १५ रुपये खर्च, केंद्रावर जाण्यासाठी ५० ते १०० रुपये, काही सामूहिक सेवा केंद्र संचालकांकडून ५०, १०० रुपयांपासून २०० रुपये आकारणी असे शेतकऱ्यांना जवळपास एकूण ४०० ते ५००,९०० चा भुर्दंड बसत आहे. व प्रशिक्षित संगणक परिचालक नसल्याने नोंदणी दरम्यान सदोष माहिती नोंद होत असल्याच्या प्रकार वाढले आहेत. शेतकऱ्यांकडून अतिरिक्त पैसे घेण्यात येत असल्याबाबतच्या तक्रारी समोर येत आहेत. सीएससी केंद्रचालकांनी अतिरिक्त रकमेची मागणी केल्यास संबंधित पीक विमा कंपनीचे कार्यालय,तहसीलदार, तालुका कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. शिंदे फडणवीस सरकारने गत अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकऱ्यांना १ रुपयात पीकविमाच्या देण्याची घोषणा केली. मात्र त्यासंबंधी उशिराने शासन निर्णय निघाला.

**तालुका कृषी अधिकारी हर्षद निगडे :** अक्कलकोट तालुक्यात आतापर्यंत १५२३३ शेतकऱ्यांनी पीकविमा भरला आहे. १३२७७ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले. एकुण जिल्ह्यात ७१२०१ शेतकऱ्यांनी पीक विमा भरला आहे ६०९०१ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले. विमा कंपनीकडुन सीएससी ला भरण्यासाठी ४० रूपये मिळतात. सात बारा व आठ अ आपोआप डाऊनलोड होते.फक्त एक स्वय घोषणापत्र,आधार कार्ड व बँकपास बुक झेरॉक्स दिले की झाले.बाकी काही लागत नाही.फक्त एक रूपया द्यावे.संबंधित सीएससी चालकाने जास्त पैसे मागितल्यास तक्रार करावे.कारवाई केली जाईल.

**तहसीलदार बाळासाहेब सिरसट :** आम्ही लाही तक्रारी प्राप्त झाल्याने सीएससी सेंटर, महा ई सेवा केंद्र व कृषी अधिकारी यांची बैठक घेऊन सुचना दिलेल्या आहेत.शेतकऱ्यांच्या तक्रारी आल्यास कारवाई करू.

**शेतकरी सिध्दप्पा धनशेट्टी :** मी एकूण सहा पीक विमा फॉर्म भरले. मला सात बारा, आठ अ, स्कॅन, फॉर्म भरणे,असे मिळुन नऊशे रूपये सीएससी धारकाने घेतले.

एक रूपयाच्या पीक विम्याचा नोंदीसाठी किमान ५०,१०० तर कुठे २०० रुपयांपर्यंत खर्च येत असल्याचा प्रकार समोर येत आहेत. शासनाने देऊ केलेल्या एक रुपयाच्या विम्याचा नेमका फायदा तरी कसा? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.



## टोळ नाक्यावरून बदली केल्यावरून रॉडने मारहाण

**सोलापूर** : टोल नाक्यावरून आपली बदली का केली ?या कारणावरून लोखंडी रॉड आणि काठीने केलेल्या मारहाणीत भगतसिंग गुलाबसिंग देवरे (वय ३५ रा. मोडनिंब ता .माढा) हा जखमी झाला. ही घटना शुक्रवारी रात्रीच्या सुमारास वडवळ टोलनाकाच्या पुढे घडली. त्याला टेंभुर्णी येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याला आकाश पाटील, अजित जीवन पाटील आणि अन्य ६ जणांनी मारहाण केली. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## संगीत पूजकांचा बालगंधर्व स्मृती पुरस्काराने सन्मान

### ▶ नाट्यगीतांच्या सादरीकरणाने अवतरले बालगंधर्व युग

सुराज्य/सोलापूर

संगीताची पूजा मांडून शास्त्रीय संगीताच्या माध्यमातून लाखो रसिकांना खिळवून ठेवणाऱ्या मूळ सोलापूरचे असलेले शास्त्रीय गायक आणि संगीतकार डॉ. अतिंद्र सरवडीकर तसेच सुंद्रीवादक पं. भीमण्णा जाधव यांचा कै. सिद्धा पाटील स्मृती समितीतर्फे बालगंधर्व स्मृती पुरस्काराने सन्मान करण्यात आला. पुरस्कार सोहळ्याच्या निमित्ताने सादर झालेल्या सोलापूरकर कलावंतांच्या नाट्यगीत सादरीकरणातून जणू बालगंधर्व युगच अवतरल्याचा भास रसिकांना झाला.

नटसम्राट बालगंधर्व यांच्या स्मृती दिनानिमित्त शनिवारी हि. ने. वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात हा कार्यक्रम झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अश्विनी वळसंगकर, प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर उपस्थित होते. तर याप्रसंगी व्यासपीठावर डॉ. अतिंद्र सरवडीकर, पं. भीमण्णा जाधव, ड. आर. एस. पाटील, मल्लू पाटील, नागेश पाटील, डॉ. अतुल देगावकर उपस्थित होते. प्रारंभी डॉ. सरवडीकर आणि पं. जाधव यांना बालगंधर्व स्मृती सन्मान पुरस्काराने डॉ. वळसंगकर आणि



प्रा. डॉ. येळेगावकर यांच्या हस्ते गौरविण्यात आले. शाल, पुष्पहार, श्रीफळ, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. यानंतर अनाहत प्रस्तुत 'स्वर गंधर्व' हा गंधर्वकालीन नाट्यगीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. गायक विलास कुलकर्णी, रमा कुलकर्णी, कनिष्का शिवपुजे या कलाकारांनी एकाहून एक सुरस नाट्यगीते सादर करून रसिकांची वाहवा मिळवली. 'पंचतुंड नररुंड मालधर' या नांदीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर कनिष्का शिवपुजे यांनी कान्होपात्रा नाटकातील 'अवघाची संसार सुखाचा करीन' हे पद गाऊन रसिकांची वाहवा मिळवली. संगीत स्वयंवरमधील 'रूप बली तो नरशार्दुल' हे रमा कुलकर्णी यांनी गायलेले पदही रसिकांना भावले. विलास कुलकर्णी यांनी संगीत मानापमानमधील 'युवती मना दारूण रण रुचिर प्रेमसे झाले ' हे पद सादर करताच सभागृहात टाळ्यांचा एकच कडकडाट झाला. यानंतर रमा कुलकर्णी यांनी संगीत मानापमानमधील 'खरा तो प्रेमाला धरी लोभ मनी', कनिष्का शिवपुजे यांनी 'मधुकर वनवन फिरत करी' ही पदे सादर करून रसिकांना ठेका धरायला भाग पाडले. त्यांना तबल्यावर नितीन दिवाकर तर संवादिनीवर प्रशांत देशपांडे, पंचम देशपांडे यांची साथ मिळाली. कार्यक्रमाचे निवेदन आणि सूत्रसंचालन मंजुषा गाडगीळ यांनी केले. या कार्यक्रमास रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# औरंग्याचा लाड करत असाल तर कब्रस्तानमध्ये तुमचे बुकिंग करून ठेवा

■ आ.नितेश राणे यांचा इशारा
■ हिंदू समाज जन आक्रोश मोर्चाला उत्सर्फूत प्रतिसाद

सुराज्य/वेळापूर

**राज्यामध्ये औरंग्याचे स्टेटस ठेवून हिंदू समाजाच्या भावना दुखवण्याचा प्रयत्न केला जातोय. जिहादी विचाराच्या लोकांना सांगतो की हिंदू राष्ट्रात, महाराष्ट्रात अशा लोकांचे लाड सहन केले जाणार नाहीत, औरंग्याचा लाड करत असताल तर जवळच्या कब्रस्तानमध्ये तुमची बुकिंग करून ठेवा, असा इशारा आमदार नितेश राणे यांनी दिला. ते वेळापूर तालुका माळशिरस येथे सकल हिंदू समाज जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होत. यावेळी झालेल्या सभेत ते बोलत होते.**





यावेळी व्यासपीठावर माळशिरस तालुक्याचे आमदार राम सातपुते, भाजपा जिल्हा संघटन सरचिटणीस धैर्यशील मोहिते पाटील उपस्थित होते. प्रारंभी सकल हिंदू समाज जन आक्रोश मोर्चास १.३० वाजता सुरुवात झाली. सुरुवातीला पालखी चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास आमदार नितेश राणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून मोर्चास सुरुवात झाली.

मोर्चा पालखी चौक येथून सुरू होऊन वेळापूर पोलीस स्टेशन, वेळापूर ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय, बाजार पटांगण, एसटी स्टँड या मार्गे पालखी चौक येथे येऊन मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. यावेळी बोलताना आ. राणे म्हणाले की सकल हिंदू समाजाने काढलेला मोर्चा हा कुठल्या पक्षाचा मोर्चा नसून हिंदू समाजाच्या वतीने औरंग्याचे स्टेटस ठेवणाऱ्या कार्ट्यांच्या विरोधात काढलेला मोर्चा आहे. हा छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांना मानणारा महाराष्ट्र आहे. जो काही आम्ही दिवस रात्र जो काही श्वास घेतोय जगतोय तो छत्रपती शिवराय आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्यामुळेच. औरंग्याचा लाड कराल तर जवळच्या कब्रस्तानमध्ये तुमची बुकिंग करून ठेवा तुम्हाला तेथे पाठवण्याची व्यवस्था करू असा आमदार नितेश राणे यांनी सज्जड दमही दिला. पाकिस्तानात हिंदू नागरिकांनी हिंदू देवदेवतांची स्टेटस ठेवल्यास तेथे सहन करतील का असा सवाल नितेश राणे शेवटी केला.

**... तर जनता सहन करणार नाही : धैर्यशिल**
धैर्यशील मोहिते पाटील म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली भारत देश हा विविध क्षेत्रात पहिल्या १० मध्ये आहे. या सगळ्या गोष्टी देशातील अनेक मंडळींना पटत नाहीत. छत्रपती शिवाजी महाराजांचा ज्यांनी स्वतःच्या दरबारात अवमान केला , छत्रपती संभाजी महाराजांना हाल हाल करून मारले अशा व्यक्तींचा जर कोणी स्टेटस ठेवला तर माळशिरस तालुक्यातील जनता सहन करणार नाही.

**मी पहिला हिंदू नंतर आमदार : राणे**
आमचे हिंदुत्ववादी विचाराचे सरकार आहे कोणी आमच्या हिंदू समाजाकडे वाकड्या नजरेने पाहिले तर कोणालाही आम्ही सोडणार नाही तसेच सर्वधर्मसमभाव ठेका काय हिंदू समाजाने घेतलाय का तुम्ही कसे ही वागायचे हे चालणार नाही मी आमदार नंतर आहे मी पहिला हिंदू आहे तुम्ही पोलीस नंतर पहिले जन्माने हिंदू आहात आम्ही सहन करण्याचा ठेका हिंदू समाजाने घेतला नाही, असेही आ. राणे म्हणाले. मोर्चाला व सभेला सकल हिंदू समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता. यावेळी सर्व सकल हिंदू समाज बांधवांच्या वतीने अकलूज पोलीस उपविभागीय अधिकारी सई भोरे पाटील व वेळापूर पोलीस प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांना निवेदन देण्यात आले.

**राजांचे नाव घेतल्यावर अभिमान वाटतो : आ.सातपुते**
धर्मवीर संभाजी राजांची नाव घेतल्यावर आज ही अभिमानाने छाती फुलून येते अशा संभाजीराजांना अत्याचार करून मारले. ते औरंगजेब या देशाचे आदर्श औरंगजेब होऊ शकत नाहीत त्यांचे तृष्टिकरण सहन केले जाणार नाही असा इशारा दिला.

## बँकेने ताब्यात घेतलेल्या घराचे सील तोडले; एकावर गुन्हा

**सोलापूर :** थकीत कर्जापोटी बँकेने ताब्यात घेतलेल्या घराचे सील तोडून वास्तव्य केल्याप्रकरणी एका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना बिंजगेर (ता. अक्कलकोट) येथे नुकतीच उघडकीस आली. यासंदर्भात बँक ऑफ महाराष्ट्र ( मंद्रप) शाखेचे कर्मचारी श्रीकृष्ण सनीशेट्टी यांनी अक्कलकोट दक्षिण पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी मल्लिनाथ शिवपुत्र बिराजदार (रा. बिंजगेर ता .अक्कलकोट) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला . थकीत कर्जापोटी महाराष्ट्र बँकेच्या कर्मचाऱ्यांनी शिवपुत्र बिराजदार यांचे बिंजगेर येती घर ताब्यात घेऊन त्याला सील केले होते. दरम्यान शिवपुत्र यांचा मुलगा मल्लिनाथ बिराजदार यानी बॅकेच्या परवानगी शिवाय सील तोडून घरात प्रवेश करून वास्तव्य केले. असे सनीशेट्टी यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास हवालदार सलगर करीत आहेत .




## महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी इसमावर गुन्हा दाखल

**सोलापूर :** शेतात कामाला जात असलेल्या महिलेचा हात पकडून तिला मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केल्याप्रकरणी इसमावर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत पीडितेने फिर्याद दिली आहे. याप्रकरणी महादेव रुद्रप्पा लोंढे (रा.बेलाटी) याच्यावर सलगरवस्ती पोलिस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला आहे. पीडित ही शेताला कामाला जात असते.१३ जुलै रोजी पीडिता नेहमी प्रमाणे कामाला जात असताना आरोपी लोंढे हा पीडितेच्या पाठलाग करत तिचा हात पकडून किती दिवस झाले मी तुझ्या मागे आहे,तूझं माझ्यावर लक्षच नाही असे म्हणत हात ओढत होता. तेव्हा पीडितेने आपला हात सोडवून तेथून पळ काढला. त्यानंतर सायंकाळी पतीला घडलेल्या घटनेची माहिती दिली. त्यानंतर याबाबत फिर्याद दिली आहे.या फिर्यादीवरून आरोपी महादेव लोंढे याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोलिस करत आहेत.



## निंबोणी येथे तरुणास काठीने मारहाण

**सोलापूर :** निंबोणी (ता.मंगळवेढा) येथे पूर्वीच्या भांडणावरून काठी, दगड आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत अंकुश धोंडीराम पवार (वय ३३ ) हा तरुण जखमी झाला ही घटना शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास निंबोणी येथे घडली. त्याला मंगळवेढा येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. भारत लक्ष्मण शिंदे त्याचा भाऊ सुरेश आणि अन्य दोघांनी मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.



# जिल्ह्यात 'फिरत्या पशुचिकित्सा' पथकांच्या नियुक्तीस सरकारची मान्यता

## ▶ पशुपालकांना दारात मिळणार अद्ययावत पशुवैद्यकीय सेवा

सुराज्य/सोलापूर

पशुस्वास्थ व पशुरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत पशुवैद्यकीय संस्थांची बांधकामे व बळकटीकरणासाठी पहिल्या टप्प्यात ८० फिरत्या पशुचिकित्सा पथकांची स्थापना करण्यास राज्य सरकारने मान्यता दिली असून, यात सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट, सोलापूर, मंगळवेढा,माळशिरस या तालुक्यांचा समावेश करण्यात आला असून जिल्ह्यातील पशुधनासाठी तत्काळ उपचारासाठी या फिरत्या पशुचिकित्सा पथकांची मदत होणार असून, पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या माध्यमातून पशुपालकांच्या दारी' अद्ययावत पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येणार आहे

राज्यातील प्रत्येक तालुक्यासह महत्त्वाच्या गावांमध्ये पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध असली, तरी अनेकदा जनावरांना तत्काळ वैद्यकिय सेवेची आवश्यकता असते, नेमकी हीच समस्या लक्षात घेऊन राज्य सरकारने फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्यांना प्रशासकीय मान्यता दिली आहे.



सध्या कार्यरत असलेल्या सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या मदतीला हे फिरते पथक उपलब्ध करण्यात येणार आहे. ज्या तालुक्यात फिरता दवाखाना नाही, तेथील पशुपालक टोल-फ्री क्रमांकावर कॉल करू शकतात. तेथून त्यांना त्यांच्या तालुक्यात उपलब्ध असलेल्या पशुवैद्यकीय चिकित्सा केंद्राबाबत माहिती व सल्ला देण्यात येणार आहे. फिरत्या पशुवैद्यकीय पथकामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांसाठी वेळोवेळी शासन निर्णयाद्वारे निश्चित केलेल्या दराने सेवाशुल्क आकारण्याचे बंधन आहे. याव्यतिरिक्त कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारू नये, असे आदेश देण्यात आले आहेत.

**एका क्रमांकावरून मिळणार मदत :** या योजनेच्या माध्यमातून सुरू केलेल्या फिरत्या दवाखान्यात तत्काळ उपचारासाठी आवश्यक असणारी सर्व उपकरणे, तसेच प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. एका फिरत्या दवाखान्याचे कार्यक्षेत्र संपूर्ण तालुक्याचे असेल. एखाद्या पशुपालकाला जनावराच्या उपचारासाठी १९६२ क्रमांकावर कॉल करावा लागेल. याबाबतची माहिती राज्यस्तरीय कॉल सेंटरमध्ये घेऊन संबंधित फिरत्या दवाखान्यातील कर्मचाऱ्यांना तत्काळ मोबाईल कॉल व एसएमएसच्या माध्यमातून माहिती दिली जाईल.

**मध्यवर्ती कॉल सेंटर :** फिरत्या पशुवैद्यकीय चिकित्सा पथके व सध्या सुरू असलेल्या जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, तालुका लघुपशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना १ व श्रेणी २ यांच्यामार्फत पुरविण्यात येणाऱ्या पशुवैद्यकीय सेवांचे सुसूत्रीकरण व प्रभावी नियंत्रणासाठी मध्यवर्ती कॉल सेंटर उभारण्यात येणार आहे. पुण्यातील औंध येथे पशुसंवर्धन आयुक्तालय हे कॉल सेंटर उभारण्यात येणार असून भारत फायनान्स इन्क्लुजन लिमिटेड या खासगी संस्थेमार्फत कार्यान्वित करण्यात येणार आहे.

## दुचाकीवरील महिलेचा मृत्यू; चालकावर गुन्हा

**सोलापूर :** दुचाकी वरून डबलसिट जात असताना खाली कोसळून महिलेच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी मोहोळच्या पोलिसांनी बाबासाहेब खेमराज पवार (रा.अहमदनगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

हा अपघात लांबोटी येथे ५ जुलै रोजी सायंकाळच्या सुमारास घडला होता. मंजुळा सुभाष वाघमारे (वय ३० रा. खालापूर जि.रायगड ) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे . ती ५ जुलै रोजी बाबासाहेब पवार यांच्या दुचाकी पाठीमागे बसून मोहोळ ते लोकमंगल पाटी येथे कामाच्या ठिकाणी जात होते. सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास ती लांबोटी जवळ दुचाकीवरून कोसळून गंभीर जखमी झाली होती. तिला सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले असता ती उपचारादरम्यान मयत झाली. या प्रकरणात फौजदार ज्योतिबा पवार यांनी मोहोळ पोलिसात फिर्याद दाखल केली होती. त्याप्रमाणे पोलिसांनी बाबासाहेब पवार (रा.अहमदनगर) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला. पुढील तपास फौजदार ज्योतिबा पवार करीत आहेत.

# भाजपात बुक्याचा मार म्हणूनच बीआरएसचा आधार

## नागेश वल्याळ, दशरथ गोप यांची 'सुराज्य'ला सदिच्छा भेट

सुराज्य/सोलापूर

भाजप चांगला पक्ष आहे. मोदी-फडणवीस यांचे नेतृत्व सक्षम आहे. मात्र सोलापूर शहरातील स्थानिक नेतृत्व अपयशी ठरले आहे. भाजपमध्ये मुक्याचा मार सहन करावा लागत असल्याने बीआरएस मध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्टीकरण माजी नगरसेवक नागेश वल्याळ यांनी दिले तर शहर विकासला डोळ्यासमोर ठेऊन आपण बीआरस मध्ये गेल्याची भूमिका पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप यांनी यावेळी मांडली.



**बीआरएस पक्षात प्रवेश केल्यानंतर माजी नगरसेवक नागेश वल्याळ, दशरथ गोप यांनी सुराज्यला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचे स्वागत सरव्यवस्थापक पुरुषोत्तम मित्रगोत्री, कार्यकारी संपादक शंकर जाधव, वृत्तसंपादक पुरुषोत्तम कुलकर्णी.**

नागेश वल्याळ आणि दशरथ गोप यांनी तेलंगणा राज्याचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या भारत राष्ट्र समिती हा पक्षामध्ये प्रवेश केल्यानंतर बुधवारी सायंकाळी दैनिक सुराज्य कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचे स्वागत सरव्यवस्थापक पुरूषत्तोम मित्रगोत्री, कार्यकारी संपादक शंकर जाधव, वृत्तसंपादक पुरूषोत्तम कुलकर्णी यांनी केले. सोलापूर शहर-जिल्ह्यात भाजपा पक्ष माझे वडील स्व. खा. लिंगराज वल्याळ यांनी वाढवला. स्व. लिंगराज वल्याळ यांचा हात धरून राजकारणात आलेल्या शहरातील स्थानिक नेतृत्वांनी पक्ष संपवण्याचा विडा घेतला. आपल्या बगल बच्च्यांना मोठे करण्यासाठी निष्ठावत भाजप कार्यकर्त्यांवर अन्याय केला. आपल्यावर देखील अनेक अन्याय केले. हे सर्व आपण सहन करत राहिले. भाजपा चांगला पक्ष आहे. मात्र सोलापूर शहरातील स्थानिक नेतृत्व अपयशी ठरले आहे. यांना शहर विकासाचे काही देणे घेणे नाही, या मालकशाहीला वैतागून आपण बीआरएस मध्ये प्रवेश केला आहे. आता बीआरएसच्या माध्यमातून शाश्वत विकास काय असतो हे दाखवण्याचा प्रयत्न आपला असणार आहे, असे नागेश वल्याळ यांनी यावेळी सांगितले. यावेळी दशरथ गोप म्हणाले की, आपण कोणताही राजकीय हेतू डोळ्यासमोर न ठेवता केवळ शहर विकास हे ध्येय ठेवून बीआरएस पक्षात प्रवेश केला आहे. यावेळी त्यांच्या समवेत समशेरसिंह अंबेवाले, संदीप वल्याळ, सचिन सोनटक्के, श्रीधर चिट्याल, दिनेश यन्नम, व्यंकटेश आकेन, सिध्दम उपस्थित होते.

## लिंगायत गवळी समाजातर्फे आजपासून कार्यक्रम

**सोलापूर :** श्री वीरशैव लिंगायत गवळी समाज महालक्ष्मी मंदिर ट्रस्ट सोलापूर यांच्यावतीने सोलापूर शासकीय रुग्णालय परिसरातील देवीमातेस आषाढ महिन्यातील अमावस्येच्या दिवशी महायात्रेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती अनिल गवळी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

आषाढ महिन्यातील अमावस्या दिवशी यात्रेस प्रारंभ होणार आहे. रविवार १६ जुलै रोजी दुपारी चार वाजता तुळजापूर येथील हुतात्मा स्तंभापासून १ हजार हजार महिलांची जलकुंभ मिरवणूक निघणार आहे. सोमवार दि. १७ जुलै रोजी पहाटे ५ वाजता केशव झिपरे यांच्या हस्ते महालक्ष्मी मातेस पंचामृत अभिषेक करण्यात येणार आहे. वीरशैव लिंगायत गवळी समाजाच्या वतीने शनिवार सकाळी ११ ते सायंकाळी ६ पर्यंत सर्व सोलापूर शहर व जिल्ह्यातील ३० हजार भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त या दिवशी दिवसभर वाद्यांच्या निनादांमध्ये म्हशी पळविण्याचा कार्यक्रमही होणार आहे. सोलापूर शासकीय रुग्णालय आवारात वृक्षारोपण तसेच रक्तदान शिबिरही आयोजित करण्यात आले आहे. सर्वांनी या महायात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन अनिल गवळी यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस केशव झिपरे , ज्ञानेश्वर अंजिखाने, सुरेश जानगवळी, संभाजी झिपरे, वसंत पंगुडवाले, कृष्णात अंजिखाने, शशिकांत अंजीखाने आदी उपस्थित होते.

# कार्यकर्त्यांनो केंद्र आणि राज्य सरकारच्या कारभाराची पोलखोल करा

## आ. प्रणिती शिंदे यांचे आवाहन

सुराज्य/सोलापूर

काँग्रेस कार्यकर्त्यांनी कार्यालयात न बसता तळागाळातील जनतेत जाऊन मोदी सरकारच्या नऊ वर्षे आणि महाराष्ट्रातील खोके आणि ईडीच्या भीतीने आलेल्या शिंदे सरकारच्या निष्क्रिय कारभाराचा पोलखोल करावी. गोरगरीबांचा वाली फक्त काँग्रेस पक्ष असून काँग्रेसची विचारधारा कोणीच संपवू शकणार नाही हे लोकांना पटवून सांगावे असे आवाहन आ. प्रणिती शिंदे यांनी केले.



सोलापूर शहर काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाचे अध्यक्ष जुबेर कुरेशी आणि सोलापूर महिला काँग्रेसच्या अध्यक्षा प्रमिला तुपलवंडे यांच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन आ. शिंदे यांच्या हस्त झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. आ. शिंदे पुढे म्हणाल्या, मोदी आणि राज्यातील तिघाड़ी सरकार लोकांचे प्रश्न सोडविण्याऐवजी भ्रष्टाचारी लोकांना गोळा करून सत्ता मिळविण्यात व्यस्त आहेत. लोक महागाई, बेरोजगारी, गॅस सिलेंडरचे दरवाढ, अन्नधान्य, भाजीपालाच्या दरवाढीने त्रस्त आहेत. जनता आमच्यासाठी सर्वस्व असून राहुल गांधी ज्याप्रमाणे भारत जोडोच्या माध्यमातून जनतेत जाऊन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या त्याचप्रमाणे लोकांच्या हितासाठी पदाधिकारी कार्यकर्त्यांनी लोकांमध्ये जाऊन काम करावे. महिलांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी महिला काँग्रेसने प्रयत्न करावे. काँग्रेस पक्षासाठी आशादायक वातावरण असून अनेक जण काँग्रेस पक्षात येण्यास इच्छुक आहेत. या कार्यक्रमास शहर अध्यक्ष चेतन नरोटे, संयोजक अल्पसंख्यांक शहर अध्यक्ष जुबेर कुरेशी, महिला अध्यक्षा प्रमिला तुपलवंडे, माजी नगरसेवक बाबा मिस्त्री, रियाज हुंडेक़री, तौफ़िक हत्तुरे, विनोद भोसले, अय्यूबभाई कुरेशी, मकबूल मोहोळकर, जिल्हाध्यक्ष वसीम पठाण, शौक़त पठाण, शकिल मौलवी, रुस्तुम कंपली, प्रवक्ते अशोक निंबर्गी, प्रदेश चिटणीस किसन मेकाले, अँड मनीष गडदे, गणेश डोंगरे, अंबादास बाबा करगुळे, श्रीकांत वाडेकर, तिरुपती परकीपंडला, युवराज जाधव, रवि हुंडेक़री, शकूर शेख यांच्यासह इतर मान्यवर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रीधर सेवा समितीतर्फे मंगळवारी शोभायात्रा

सुराज्य/सोलापूर

श्रीधर सेवा समिती सोलापूर यांच्या वतीने पुरुषोत्तम मास निमित्त मंगळवार दि. १८ जुलै रोजी शोभायात्रा काढण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष रामवल्लभ जाजू यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यंदाच्या वर्षी महालक्ष्मी महाजन व श्रीमद् भागवत कथा तिरुपती येथे दि. ३ ते ९ ऑगस्ट दरम्यान होणार आहे. यानिमित्त श्री म्हास्वामीजींचे श्री सिध्दरामेश्वर यांच्या पुण्यनगरीत ८ जुलै रोजी सकाळी ११.३० वाजता आगमन होणार आहे. श्रीधर सेवा समिती यांच्या वतीने १८ ते २० जुलै दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी सायंकाळी ६ वाजता सोलापुरात झलरीया पीठाधीश्वर श्री श्री १००८ परमपूज्य स्वामी श्री घनश्याम आचार्यजी महाराज सह लक्ष्मी, वेंकटेश, भूवी व देव देवतांची शोभायात्रा काढण्यात येणार आहे. यात्रेची सुरुवात चंद्रातारा बिडी वर्क्स (तिवाडी निवास) बाळीवेस येथून होणार आहे. ही शोभायात्रा चाटीगल्ली, मंगळवार पेठ पोलीस चौकी, बलिदान चौक मार्गे तुळजापूर वेस येथील सोमाणी मंगल कार्यालय येथे सांगता होणार आहे. १९ जुलै रोजी सकाळी ९ वाजता कमल पुष्प अर्चना, सकाळी साडेअकरा वाजता शंखचक्र, दीक्षा चे समारोह संध्याकाळी ६ वाजता सुंदर कांड व महास्वामीजींचे आशीर्वाचन आणि प्रसाद वाटप होणार आहे. या शोभायात्रेत व कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन जाजू यांनी केले आहे. पत्रकार परिषदेस ओमप्रकाश तिवाडी, गोविंदप्रसाद लाहोटी, बाबुशेठ सोनी, मधुसूदन कालाणी, राजगोपाल झंवर, रामचंद्र जोशी, चिदानंद मुरतारे, बसवराज कुलकर्णी उपस्थित होते.